Your word rules

# ती



शब्दपर्ण स्त्री विशेषांक २०२२

Your word rules

# स्त्री विशेषांक-'ती'

**संपादिका**-प्रिती गजभिये

**मुखपृष्ठ**- स्वरुपा निंबाळकर

**प्रकाशक**-शब्दपर्ण टीम

**संपर्क** - shabdaparnamarathi@gmail.com

# संपादकीय



'ती' ला पुढे नेण्यात,तिचे अस्तित्व निर्माण करण्यात समाजाच्या विरोधात जाऊन ज्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले त्यांना सर्वप्रथम वंदन.

शब्दपर्ण टीमचा हा पहिलवहिला स्त्री विशेषांक वाचकांना सुपुर्द करतांना मनस्वी आनंद होत आहे,

ती 'काळानुरुप बदलत गेली.नव्या जबाबदाऱ्या पेलू लागली.अर्थात यासाठी तिला सुधारणावादी स्त्रियांबरोबर समतेचा पुरस्कार करणाऱ्या पुरुषांचीही साथ मिळाली.

शरीराने, मनाने नाजूक आहे असे म्हणता म्हणता पंखात बळ भरुन गगनी झेप घेणारी 'ती'
अन्याय,अत्याचार सहन करत कित्येक पिढ्यानंतर स्वत्वाची जाणीव झालेली 'ती'
कधी कधी अजूनही चाचपडतेय स्वतःचा आब,मान,सन्मान राखण्यासाठी 'ती'

'ती' च्या घरट्याच्या आतच 'ती' चे अस्तित्व ,
चुल आणि  मुल सांभाळण्यातच 'ती' च्या आयुष्याचे सार्थक...या वर्षानुवर्षाच्या समजाला छेद देत उंबरठ्याबाहेर पाऊल टाकलेली 'ती' आता प्रत्येक  क्षेत्रात जाऊन पोहचली.....

विविध क्षेत्र तिने  स्वकर्तृत्वाच्या जोरावर काबीज केले आहेत,
किरण बेदी, कल्पना चावला, इंदिरा गांधी, पी.टी. उषा, मेरी कोम, लतादीदी, आशाताई...
पण तिच्या कतृत्वाकडे दुर्लक्ष करत आजही 'ती' नको 'तो'च हवा असा हट्ट धरणाऱ्या काही समाजात जन्म होण्याआधीच तिला संपवण्यात येते.

Your word rules

'ती' ने प्रेमाला नकार दिला म्हणून 'ती' च्यावर ॲसिड टाकण्यात येते,

स्वतःच्या सुखासाठी 'ती' च्यावर अत्याचार केला जातो.आजही समाज त्याच्याशिवाय 'ती' चे अस्तित्व मानायला  तयार नाही...अजूनही ती पूर्ण मुक्त आहे कि मुक्ततेच्या वाटेवर आहे कि इथेच मुक्त होण्याचा प्रवास थांबलाय....अशाअनेक प्रश्नांची आवर्तने  तिच्याभोवती आहेत.

घराबाहेर कर्तबगार असलेली ,मान मिळवणारी 'ती' उंबरठ्याच्या आतही तेवढाच मान मिळवते कि जुनी मानसिकता आजही तिच्यावर हल्ले चढवते....असे एक ना अनेक अनुत्तरीत प्रश्न....अजूनही 'ती' उत्तरे शोधत आहे.

तिमिरातून तेजाकडे ,प्रगतीपथावर एकेक पाऊल टाकत नेटाने पुढे  जाणाऱ्या ' ती'ला  शब्दपर्णकडून अनेक शुभेच्छा

'ती '....शब्दपर्ण टीमने प्रकाशित केलेल्या स्त्री विशेषांकात ती च्यावर आधारीत कविता,लेख ,कथा,वाचा.
आवडल्यास दुसऱ्यांनाही वाचायला सांगा

Pgajbhiye

प्रिती गजभिये

# अनुक्रमणिका

## कविता

**ती**
सुमती आव्हाड

**कसला आलाय वुमन्स डे**
रागीणी पवार

**सरिता**
वैशाली देशमुख

**लक्षात ठेव**
स्मिता धर्माधिकारी

**स्त्री -वेदनेची कहाणी**
स्वरुपा निंबाळकर

**ती**
पोर्णिमा शिंपी

**एकटी**
राजेश गिरे

**सबला तू नारी**
सुवर्णा पाटुकले

**स्त्री शक्ती आणि वास्तव**
नयना निगळ्ये

**काहूर तिच्या मनातले**
प्रज्ञा तगलपल्लेवार













# कविता

## अभिमन्यु
शैलजा पाटील

## तीच आदिमाया
मेघना पाटील

## अस्तित्व
वृषाली पाटील

## क्रांतीज्योती
प्रभा वाघ

## शक्ती जागर
शरयु कोंडगिरे

## तिने जणू युद्धच जिंकले
गीता सकपाळ

## ती
पारिजात देशमुख

## महिला दिन
सीमा अलोणे

# कथा


**जननी**
संतोष जगताप

**फुलली रातराणी**
ज्योती रामटेके

**गुरुदक्षिणा**
प्रिया देशपांडे

**पसंती**
दर्शना भुरे

**एक नवी सुरुवात**
स्मिता भोसकर

**बोलके चित्र**
वैशाली जोशी






# ललित लेख


**हृदयी वसंत फुलतांना**
सोनाली सहारे


# लेख


**महिला दिन – एक दृष्टीक्षेप**
रागिणी पवार

**व्यक्ती स्वातंत्र्य आणि आजची स्त्री**
स्वप्ना रैंच

**स्त्री विकासाचा प्रवास**
निर्मला मेंढे

**प्रगातशील नारी**
अपर्णा बडे

**पुरोगामी विचारांच्या स्त्री उद्धारक – अहिल्याबाई होळकर**
शरयु कोंडगिरे

Your word rules

# कविता





# ती

सुमती आव्हाड

रात्रीच्या ह्या थंड काळोखात
विझणार्या दिव्यांसोबत
'ती' ही हळूहळू विझते आहे

पण त्याआधी, उद्याची काही स्वप्ने
तिने मुलाच्या दप्तरात भरून ठेवली आहेत

सकाळी घराबाहेर पडताना
मागे राहील, त्या घराची घडी
तिने काळजीपूर्वक घालून ठेवली आहे.

बाहेरच्या जगात लागणारे मुखवटे,
रंगरंगोटी
साफसफाई करून
पर्स मध्ये सरकवली आहे.

घरातील बाकीचे, बाहेर असताना
त्यांना घरचे घास मिळावेत
म्हणुन तिने स्वतःच्या ताटातले
शेवटचे दोन घास तसेच ठेवले आहेत.

Your word rules

उद्या स्वैपाकघरात काय शिजणार
याची स्वतःच्या मनाबरोबरच
फ्रीज मध्येही बेगमी केली आहे

छकुल्याला भरवून, थोपटून
मायेच्या कुशीत झोपवण्या आधी
दोन अश्रू डोळ्यातून गालावर
ओघळून गेले आहेत.

मिटायचे बाकी राहिलेले कितीतरी हिशोब
स्वतःशीच भांडून आणि मग
मांडूनही झाले आहेत.

आता ती राहिलेलं उष्टं खरकटं काढून
तिच्या हक्काचं स्वैपाकघर आवरते
ओट्यासोबत, स्वतःलाही जरा सावरते

तरी तिचा दिवस अजून संपलेला नाही
स्पर्शाने काही देणी फेडायची आहेत
बळजबरीच्या समाधानाची नाइटक्रीम
चेहऱ्यावर फासायची आहे

आणि मग उद्या पुन्हा रोजच्याच
धावपट्टी वर धावण्यासाठी
श्वास साठवायचे आहेत.

Your word rules

झालीच भेट स्वतःशीच स्वतःची, तर
काळजी घ्यायला सांगायचं आहे.
स्वतःलाच थोडं समजवायचं आहे

रात्रीच्या ह्या निर्विकार काळोखात
विझणाऱ्या दिव्यांसोबत
'ती' ही हळूहळू विझते आहे





# कसला आलाय वुमन्स डे

रागीणी पवार

खुरपी,टोपलीने सुरु होणारा दिवस
माती मऊशार करता करता
हाताला पडलेला घट्टा
बांधावरच्या बोरी,बाभळींचा
कसला आलाय वुमन्स डे

कोयता हातात असला तरी
नाहीत कापता येत
दारिद्र्य अन् गुलामीचे दोर
पालातील आर्त वेदनेचा
कसला आलाय वुमन्स ड

भाकरीच्या चंद्रासाठीची
बुरगुंडा पाठीला बांधून
रोजच रणरणती भटकंती
तारेवरच्या कसरतीचा
कसला आलाय वुमन्स डे

रोजचाच दिवस सारखा
नाविन्य ते काय त्यात
भळभळत्या जखमा उरी
झोपडितल्या पणतीचा
कसला आलाय वुमन्स डे





# सरिता

वैशाली देशमुख

दोन किनारे ओले करत
सरिता बनून धावते
चंचल,अवखळ वाहते
खाच ,खळगे भरवून सरते

डोंगराच्या पोटातून, कडेकपारीने
नागमोडी वळणे स्पर्शून घेते
धबधब्याचे रूप सुंदर भासते
यौवन देह ठेचाळला लपे

दुधाळ पदर,मायेचा पाझर
दोन्ही काठांना हिरवा शिवार
सजिरे, गोजिरे माहेर
ओटीत सासरचा आहेर

ओहळ,झऱ्याचे हातात बोट
सर्वांना सावरण्यात दंग
गर्भात निर्झर ओल
हृदयातून प्रेमाचे सिंचन

आशिष तू , पवित्र गंगा
धरेस तुझी कृपाछाया
नगण्य भासते आभाळमाया
तळपत्या सुर्याची शीतलता

भरभरून दान पदरात
सामावते सागरी उदरात
गोड,निर्विकार धैर्यात
खार गुंतला बाहुपाशात



Your word rules



# लक्षात ठेव

स्मिता धर्माधिकारी

देवा ब्राह्मणांच्या साक्षीने ज्याने तुझ्या गळ्यात मंगळसूत्र घातले,
तुझे रक्षण करण्याचे वचन दिले,
तोच हात आज त्याने तुझ्यावर उचलला..
अगदी  सहजपणाने

तो तुझ्या भावाचा मित्र म्हणून घरी येत राहिला,
तूही त्याला एक भाऊ म्हणूनच मान दिला,
त्यानेच आज तुझ्यावर घरी येऊन बलात्कार केला..
अगदी सहजपणाने

ज्याच्यावर तू जीवापाड प्रेम केलेस,
ज्याला आपले सर्वस्व समजलेस,
एका सुडापोटी त्याने आज तुझ्यावर ॲसिड फेकले..
अगदी सहजपणाने

ज्या हातात तू तुझा हात दिलास,
ज्याला जेवायला घालायला तू गॅस पेटवलास,
त्याच गॅसवर काडी पेटवून त्याने आज तुला जाळले..
अगदी सहजपणाने

अग! त्याला इतकी साधने मिळाली
तुला तुझ्या स्वयंपाक घरातील एकही नाही?
बत्ता, सुरी, झारा,लाटणे
यातले काहीच दिसले नाही?
अग! त्यांच्या एकाच वाराने
तुझ्या अंगावर उठणारे,
तुझ्या अंगावर पडणारे, तुला पेटवणारे त्याचे हात थोडावेळ तरी
नसते का निर्जीव झाले.
कशी ग विसरलीस तुझ्याजवळ ही हत्यारे आहेत

लक्षात ठेव तु दुर्गा आहेस
द्रौपदी होऊ नकोस
स्वतःच हत्यार हातात घे,
तुझे वस्त्रहरण थांबवण्यासाठी कोणा पांडवांची वाट बघू नकोस

लक्षात ठेव सरस्वतीच्या जोडीने आता तू
महाकालीही व्हायला हवेस,
अन् तुला रोखणाऱ्या वृत्तींना
तूच छाटायला हवेस



Your word rules



# स्त्री -वेदनेची कहाणी

स्वरुपा निंबाळकर

घेतली का समजून कधी तिची व्यथा...
की नुसत्याच गाव्या महिलादिनी तिच्या गाथा...
किती येती तिच्या आयुष्यात उतरचढाव...
झुंजावे तिनेच सहनशीलतेने प्रत्येक पडाव...
वेदनांचे घाव झेलून का फक्त  मनी रडावं? ..
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी ....

गर्भातच खुडली जाते कितीदा ही कळी
वंशाच्या दिव्यासाठी स्त्रीचाच  का बळी?
बुजवून टाकी तिच्या गालावरची खळी
कळेनाही अन वळेनाही कसे,
तिच्याशिवाय वाढेल का वंशावळी...
किती दिवस तिला या तप्त वेदनेत जाळी....
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी ....

एका आयुष्यातच ती जन्म घेते कितीदा ...
मुलगी म्हणून येते जन्माला...
बोल बसे वेदनांचा तिच्या अस्तित्वाला..
जपावे तिनेच स्वतःला प्रत्येक वळणावर... .


Your word rules

टाकावे प्रत्येक पाऊल राहून भानावर...
असे स्त्रीपणाच्या शापित वेदनेने मरावे खूपदा...
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी ...

जन्म घेते दुसरा जेव्हा ओलांडते माप...
सोडून येते घरदार नि मायबाप...
काय हवे असते फक्त तिला,
प्रेम, माया, आपुलकी नि कौतुकाची थाप..
बघ गं बाई, मिळाले तर ठीक,
नाहीतर मानसिक वेदनेच्या होरपळीत राप...
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी....

सासूबाई  अजूनही सुनेला छळे...
सुनेला तरी कुठे सासूचे मन कळे...
कित्येकदा तर स्त्रीच स्त्रीवर जळे...
इथे स्त्री तरी कुठे करी  स्त्रीचा आदर...
तिथे तरी कुठे मिळते आपुलकीची चादर...
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी...

मुलगी, पत्नी, सून, आई, आजी असे किती जन्म...
अन  प्रत्येक जन्माच्या निराळ्या वेदना...
सख्याच्या प्रीतवेदनेचा लागतो लळा...
मातृत्वासाठी सोसते सुखद वेदनांच्या कळा..
वासनेच्या नजरेच्या ही कधी बसती झळा...
अशी आहे स्त्री जन्माच्या वेदनेची कहाणी...
जाणिल्या का किती वेदना रुतुनी बसल्या तिच्या मनी....





# ती

पोर्णिमा शिंपी

महिलांचा दिवस तसा
असतो रोजच
कारण तिच्याशिवाय
पान हलत नसतं कोणाचंच

सकाळ झाली की
हातात झाडू घेते
चहा पाणी, नाश्ता करण्यात
तिची सकाळ उलटून जाते.

घरभर झालेला पसारा
एकटीच आवरत असते
कोणाला काय हवे
यांवर बारीक लक्ष ठेवते.

घराला घरपण देता देता
स्वतःचं बाईपण विसरून जाते
घरातल्या लहान थोरांसाठी
ती पंख पसरून वाहते.

हट्ट सर्वांचे ती पुरवित असते
ज्याला जे हवे ते शिजवत असते
स्वतःच्या आवडी निवडीकडे
कानाडोळा करीत असते.

घरात चौफेर नजर तिची असते
काय हवे नको यातच ती रमते
सर्वांचे आजार बरे करता करता
ती स्वतः मात्र खंगत असते

घरखर्चासाठी मिळालेल्या पैशातून
तांदळाच्या डब्याची बँक करते
झालाच पतीचा पगार उशिरा
तर हातात त्याच्या नोटा देते.

जिथं जाते होते तिथली
सासर असो वा असो माहेर
दोन्ही घरांनी सोनक्षणांचा
द्यावा भरजरी पैठणी आहेर

Your word rules



# एकटी

राजेश गिरे

खूप काळजी असते ओ
कुठे गेली ?
का गेली ?
कोण आलेय ?
किती वाजता आली ?
इतक्या रात्री ?
अरे एक न अनेक प्रश्नांची मालिकाच जणू...
एकटी आहे....
सो व्हॉट......?
आलीय तुमच्या दारात ?
मग का ओ प्रश्न पडावेत ?
हेच प्रश्न कधी आपल्या मुलांना
आपल्या नवऱ्याला
आपल्या बायकोला विचारा बरं..
ना....
तिथं बोलती बंद असते

इथं आम्ही एकट्या आहोत हो
पण नाईलाजाने
कोणाचे कायमचेच सोडुन गेलेत
कोणाचे घटस्फोट झालेत..
पण ताठ मानेने संभाळतोय न घर?


तिलाही प्रॉब्लेम असतात
तिचीही मुलं असतात
पण नाही रात्री कुठं दिसली की डेंटिग
आणि सो कोल्ड सोसायटी वाले..
नाईट लाईफ...???
तिलाही आहेत ओ भावना
तिलाही आहे स्वाभिमान
तिलाही आहे आत्मसन्मान
एकटी बाई म्हणजे अव्हेलेबल??
जरा विचारा स्वतःला
आपल्यावर पण होऊ शकते
नियती नाराज.....



# सबला तू नारी

सुवर्णा पाटुकले

नको होऊ तू बाहुली नाचणारी
नको फक्त ती पुस्तके वाचणारी
तोडून दे दोरी ती काचणारी
नको बंधने पाळू ही जाचणारी
जप तू मनातील नेहमीच आस
नको मार खाऊ, नको लावू फास
देतात जे दीन दुबळ्यास त्रास
नको होऊ त्यांच्यातला एक घास
नको स्वप्नं महालातली फक्त वारी
नको आयते सुख मागूस दारी
खचवून दुखवून जातील सारी
नको सोडू निर्धार, सबला तू नारी.



Your word rules



# स्त्री शक्ती आणि वास्तव

नयना निगळ्ये

पूर्वापार असामान्य शक्ती आणी सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या स्त्रीचे वास्तववादी मनोगत. मग ती स्त्री कधी असते न जन्मलेली बालिका, कधी अबला तर कधी बाईपणाच्या चौकटीतून स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्नरत सबला. जेव्हा या साऱ्याला मूठमाती मिळेल तोच खरा स्त्रीदिन. शब्द तेच, साकारतात स्त्रीचे मनोगत तीन वेगळ्या भावना अन् भूमिकांतून.

आडरानी आडवाटेला
अतीरम्य तुझा हा गाव
मी उरले माझी आता
मज नको तुझे आडनाव

मातीच्या अंधुक वाटा
मातीत मिसळुनी गेल्या
मी अर्घ्य उभ्या जन्माचे
तू दिवस साजरा केला

काळीज उकलले जेव्हा
वेढले मला वळणाने
हुरहुरल्या क्षितिजानेही
सत्कार कोरडा केला

ममतेच्या बेड्यांसाठी
व्यापार आईचा झाला
मज यात्रेची पुण्याई
मग प्रवास जरी तू केला

मी दुर्गा शक्ती गीता
मी कुंती द्रौपदी सीता
गवसले मला मी जेव्हा
शृंगार मढ्याला केला

माझ्याच आईच्या पोटी
मी जन्माआधीच विरले
स्त्रीत्वाचा गौरव करण्या
भिंतीवर नारे उरले

Your word rules



# काहूर तिच्या मनातले

प्रज्ञा तगलपल्लेवार

काळानुसार बदलले जरी
स्वरुप नारीच्या वास्तवाचे
परखडपणे वाचा फोडली तर
धोक्यात येते रुप अस्तित्वाचे

घाव घालुनी काळजावर घातक
बलात्कार,अत्याचार रोज घडतात
अन्यायाला वाचा फोडायची तर
कोर्टाच्या पायऱ्या पाय झिजवतात

माणुसकीला तडा गेलाय तरी
कुठल्या कोर्टात दाद मागायची
भावनेला,अश्रुंना थाराच नाही
अशीच रीत असते जगायची

गप्प बसूनच सोसायच्या वेदना
मारायची फुंकर अलगद त्यावर
जखमांचे घाव ओले तरीही
सोबत घेऊन सर्वांना तूच सावर

नको मारुस येरझाऱ्या अन्
शोधू नकोस माणुसकीला
रक्तबंबाळ झाले पाय जरी
अंधारात चालायचे तुला एकटीला

संकटे येतील तुझ्यावर
जाशील तू जिथे जिथे
थांब,येते मीही सोबतीला
शोधू माणुसकीला इथे तिथे

Your word rules



# अभिमन्यु

शैलजा पाटील

( एका गृहकृत्यदक्ष , सर्वांवर प्रेम करणाऱ्या स्त्रीची व्यथा ! )

दुधावरच्या सायीत
दिसते तुझी माया ।
नवनीताच्या अणुरेणूत
दाट तुझी छाया

माया जपत राहणे
हाच माझा ठेवा
छायेत सामावण्याचे
तूच तुझे पहा

समाज असा खानदानी
कर्माच्या गहन गति
चक्रव्यूहातल्या अभिमन्यू
झुंज देशील किती ?

अहंकाराचे डोलारे उभे
मी पुढे जाऊच नये
सर्वांसाठी हवे होते
ते मलाच मिळू नये

पुन्हा पुन्हा तेच डाव
पुन्हा पुन्हा तीच खेळी
सरळमार्गी पायवाट
काया - बुद्धी झाकोळली

अजून मन जागे आहे
रोधूनी अर्थ - पंचक ( विकार
)
नेणीव व्यक्त होत नाही
हीच त्याची खंत



Your word rules



# तीच आदिमाया

मेघना पाटील

ती जन्मजात माता असते
ममत्वतेचा गुण घेऊनच
ती जन्मास येते

कन्या होऊन घरात येते
बघता बघता सगळ्या
घराची ती आई होते

ती दिसते नाजूक वेल
पण वाघिणीची हिंमत
तिच्या काळजात असते

असेल जोडीदार तर संगतीने
नसेल तर एकटीने
पण संसार ती रेटून नेते

कधी लक्ष्मीबाई होऊन
रणरागिणी ती देशासाठी
तलवार हाती घेते

कधी सतीसावित्री होऊन
पती संरक्षणार्थ ती
यमराजासोबत भांडते

ती सवित्रीमाई, ती अहिल्याबाई
पदरात निखारा बांधून
वसा समाजसेवेचा घेते

ती स्त्री, ती नारी, ती महिला
काहीही म्हणा तिला
पण लक्षात ठेवा
ती भगिनी, ती माता, ती कन्या तुमची
असते
ती लक्ष्मी, ती दुर्गा अन् तीच आदिमाया
असते



# अस्तित्व

वृषाली पाटील

उजाडलं होत कपाळ जरी
ती जगू पाहत होती..
पावलोपावली अस्तित्वासाठी
संघर्ष करत होती..
तिला जिवंतपणी मरणयातना
देणाऱ्या याच बायका
तिच्या प्रेतावर आज
अश्रू ढाळत होत्या..
मनाला सुन्न करणार
घडत होत सगळं
जिच्या चारित्र्याविषयी
जिवंतपणी फक्त शिंतोडे
उडवले जायचे तिच्याविषयी आज चांगल बोलल जात होतं..

सहनशक्तीच्या पलीकडचं
घडत होतं सारं..
स्वतः स्त्री म्हणून जन्माला
येऊन.. एका स्त्रीचं
अस्तित्व मिटवलं होतं
यांनी..

Your word rules

स्त्री जातीला स्त्री असून
कलंक ठरल्या होत्या या बायका
काय बोलावं??
एकीकडे स्वतः ला अब्रूदार म्हणत असतानाच

आपली संस्कृती, बांगड्या, साडी,
कपाळभर घसघशीत कुंकू
सगळं मागे टाकल होतं यांनी..
मग यांना कोणी हक्क दिला
एका स्त्रीला उपेक्षितपणे
बोलण्याचा??
मला असहय झालं सारं
मी उठले.
मनात खूप काही ठरवून
भविष्य समोर दिसत होतं..
माझ्या लेखणीला साद घालत होतं
आता मी खेचणार होते
माझ्या कवितेतून
त्या प्रत्येक स्त्रीला
जी स्वतः एक स्त्री असून
एका स्त्रीच अस्तित्व संपवण्याला
कारण ठरत होती...

Your word rules



# क्रांतीज्योती

प्रभा वाघ

मुक्ती देण्या स्त्री ला सरस्वती अवतरली
मुजरा मानाचा तुला सावित्री माऊली

घुसमटलेल्या मनात होते कर्तृत्त्व बंदिस्त
चुलीवरच्या धुराड्यातच काळवंडे अस्तित्त्व

सौदामिनी ज्ञानाची अशी कडाडली
केशवपणा थांबवा शपथ नाभिकांना दिली

दत्तक घेऊन बाळाला, सांभाळी अबलांना
गौरव त्यागाचा पतीसह पोचली सन्माना

अंतिम क्षणीही टिटवे घेऊन पतीचे निघाली
धाडस हे तिचे पाहता वसुंधरा थरथरली

स्वयंभू आज नारी तिचा वाढे आत्मसन्मान
युगंधरा,तुझ्यामुळे नारीस आज बहुमान

महामारीत जनसेवा करता धारातिर्थी पडली
क्रांतिज्योती तू ठरे ज्योतिबाची सावली



Your word rules



# शक्ती जागर

शरयु कोंडगिरे

तुझ्या त्या अमर कीर्तीचे
वाजू दे नगारे चौघडे
तेव्हाच
शोभून दिसेल तुझ्या
पायात चांदीचे जोडवे

निर्माण कर आपल्या
अस्तित्वा पुरते कोंदण
तेव्हाच
शोभून दिसेल तुझ्या
पायात चांदीचे पैंजण

वाईट रूढी परंपरा आणि
अंधश्रद्धेवर मार रट्टा
तेव्हाच
शोभून दिसेल तुझ्या
सिंहकटी वर कंबर पट्टा

कसून कर स्वतः आपल्या
सच्छील चारित्र्याची राखण
तेव्हाच
शोभून दिसेल तुझ्या
हातात पाटल्या अन काकण

सुना जावई मुले मुली
नातवंड लावतील लळा
तेव्हाच
शोभून दिसेल तुझा
सोन्याच्या मंगळसूत्राने गळा

तुझीच वाट पाहतोय
हा नव्या नवलाईचा पथ
तेव्हाच
शोभून दिसेल तुला
नाकात हिऱ्याची नथ

पेटती ठेव शब्दांची मशाल
नकोस फक्त चूल फुंकू
तेव्हाच
शोभुन दिसेल तुझ्या
ललाटावर लाल भडक कुंकू
कुरळ्या कुंतलाची घाल वेणी
त्यावरी माळ मोगऱ्याचा
गजरा
तेव्हाच होशील

तु मानीनी, तू रणरागिनी
नार रूपवान तू बहुगुणी

वाट पाहतोय तुझा धनी
उभी दारात तुझ्यासाठी गाडी
तेव्हाच
शोभून दिसेल तुला
येवल्याची पैठणी साडी

मनात असलेले रूप जिजाऊचे
आता आण आपल्या ध्यानी
शुभेच्छा तुला अनेक आजच्या जागतिक महिला दिनी



Your word rules



# तिने जणू युद्धच जिंकले

गीता सकपाळ

चुल आणि मुल यांचे स्त्रीशी असलेलें
नाते युगानुयुगे चालत आले
नयनी पाणी हृदयी पान्हा
हेचि सर्वस्वी जणू तिचेची जाहले,

रांधा वाढा उष्टी काढा हेचि
जणू तिच्या नशिबी आले
का म्हणूनी विचारीले
तर कुणीही नाही समजवले

असंच घडत असता त्या
१९व्या शतकात एक असेही अघटीत घडले,
का स्त्रीने स्वबळावर उभे राहू नये
असे तिच्या मनाने ठरविलें
आणि म्हणूनच की काय ब्रम्ह देवाने
एका शारदेस धरणी पाठविले

स्त्रिच्या शिक्षणासाठी आणि सक्षमतेसाठी
तिने जणू युद्धच लढले
आणि आज आम्हा समस्त स्त्रियांना सुशिक्षित करून
तिने जणू युद्धच जिंकले

सावित्रीबाई फुले
सावित्रीबाई फुले
सावित्रीबाई फुले
त्यांना मी शतशः वंदिले



Your word rules



# ती

पारिजात देशमुख

ती सर्वांगी सुंदर सर्वत्र वसते,
ती प्रत्येक वयात शोभून दिसते...

ती प्रत्येक नात्यात सहजच रूजते,
स्वतःच ' स्वत्व ' विसरून त्यागाला पूजते...

तिच्यातलं वात्सल्य,करुणा, औदार्य,
तिच्यातला स्वाभिमान, प्रखरता, सौंदर्य...

तिची निष्ठा,तिचं स्त्रीत्व निस्वार्थ प्रेम, ममत्व,
नात्यांना फुलवून जपलेलं सुखी परिवाराचे तत्व...

तिचं बहरून येणं,नटणं,
हळूच मुरडत लाजणं...

तिचं सृष्टीशी एकरूप असणं,
तिचं निरांजनाच्या ज्योतिसारखं प्रकाशमान होणं...

शासन करते वेळी तिचं विजेसारखं चमकून जाणं,
तिच्या पायी ऐश्वर्य, समृद्धी , निपुणता, सामंजस्यता
नाविण्यपूर्णता,कलागुण...

तिचे तिला तिचं पूर्णत्व शोभणं,
तिच्यातील स्त्री-शक्तीशी तिचं जागरूक असणं...

दुर्गा,महालक्ष्मी,सरस्वती,काली
माझ्या जीवनातील प्रत्येक ' स्त्री 'ला हे शब्द पुष्प अर्पण...





# महिला दिन

सीमा अलोणे

म...मजबूत, दणकट तू नारी
नाजूक देह असला तरी
हि...हिंमतवान आहेस खरी
ताठ उभी तू संसारी
ला...संसारात शिरली लाजरी, बावरी
पण कणा बनुनी उभी तरी
दि...दिलासा कायम पाठीवरी
मायेचा ओलावा ममता उरी
ना...नाना अपेक्षांचे ओझे परी
सावरले तू, सक्षम धुरंधरी
च्या...संसारात त्याच्या नवी जरी
संसाराची तू धूरकरी
हा...हालअपेष्टा आल्या जरी
खंबीरपणे जाते सामोरी
र्दि...दर्दी, छंदी असली तरी
मुलाबाळांसाठी सारं दूर करी
क...कणखर, कठोर ,कडक भारी
वेळप्रसंगी दुर्गा अवतारधारी
शु...शुक्राच्या त्या चांदणी परी
संसारात स्थान अटळ तरी
भे...भेदभाव तू कधी न करी

Your word rules

सासर,माहेर दोन्ही च्छा...इच्छा आकांक्षाची ओढतरी
कुटुंबासाठी सोडी सारी
म्हणून तू महान खरी
तूच संसाराची शान खरी

# कथा




Your word rules



# बोलके चित्र

वैशाली जोशी खोडवे

चित्र बघितले ...अन् उगाच वाटून गेले ,अरे ही स्त्री  तर आपल्याच पिढीचे प्रतिनिधित्व करते आहे ...
खोल शून्यात जाणारी नजर,डोक्यात विचारांचे काहूर, खांद्यावर जबाबदारीचे ओझे,अनेक खस्ता खाऊनही मनात फुलणारी उद्याची आशा, आणि ह्या अशा  सगळ्याच संमिश्र भावनांचा आरसा बनलेला हा चेहरा.



तसे पाहिल्यास आपल्या पिढीतील स्त्री चे प्रातिनिधीक चित्रच ह्या फोटोत दिसते.थोड्याफार फरकाने आपणा सर्वांचीच ही मनोवस्था आहे. एकीकडे नव्या युगाचे दिसणारे सामाजीक मोकळेपण,काहीशी स्वमग्न असणारी आजची पिढी, आणि दुसरीकडे शिस्तीच्या, कर्मठ संस्कारांच्या मुशीत वाढलेले आपण,हे सगळे आणि आपले मन ह्यांची नेहमीच कुठेतरी टक्कर होत असते.

आपल्या पिढीच्या स्त्रियांवर जी शिस्त, जी बंधने संस्काराच्या गोंडस नावाखाली लादली गेली होती ती खरोखरच योग्य अथवा आवश्यक होती का? त्यामुळे आपण कित्येक आनंदाच्या क्षणांना मुकलो आहोत. एवढेच

नाहीतर तर कित्येक जणांच्या उपजत बौद्धिक क्षमतेला मारण्याचे काम त्या तथाकथित शिस्तीने केले.

आज आपण आपल्या मुलींवर,त्या शिस्तीचा बडगा उगारत नाही आहोत. आपण सगळेच जे आपल्या सोबत झाले ते आपल्या मुलींसोबत होऊ नाही ह्याची काळजी घेतो आहे आणि ही पिढी पण आजच्या काळाशी सुसंगत असे वर्तन करत आहेत त्यामुळे त्यांची वाताहत होत आहे असे अजिबातच नाही.उलट प्रगतीच होत आहे. मग आपल्यावर ते संस्कार लादून आपले काय भले झाले आहे हा विचार वारंवार मनात येतो.

आपल्या मागच्या पिढीने आपल्याला जी शिस्त लावली ती त्यांच्या परीने बरोबर असेलही, पण आपण आपल्या मुलींना देत असलेला मोकळेपणा ही चुक नाही. लहानपणी लावलेली शिस्त आत्मसात करून, मोठेपणी ती चौकट तोडून, त्यातून बाहेर पडत, आपल्या मुलींना त्याही पुढच्या काळाशी सुसंगत अशी घडवणारी आजची स्त्री खरोखरच धन्य आहे.

Your word rules



# ह्रदयी वसंत फुलतांना.

सोनाली सहारे

वसंत फुलला
वसंत फुलला
हिरवा शालू
नेसून वसंत फुलला.

वसंत ऋतूचे आगमण खरचं
किती छान परत एकदा मला
घेवून जाते त्या हिरव्याकंच
वनराईत वसंत ऋतूत बहरणारे
प्रेम.

वसंत ऋतूत बहरणारे प्रेम....
येता वसंत ऋतू
आल्हाद मनास होतो भारी
तुझ्या माझ्या प्रेमासाठी
बघ!कसा निसर्ग बहरतो
सभोवताली

स्त्रीचं मन खरचं खूप
संवेदनशील असते.तिच्या
भावना,तिचे प्रेम, तिच्या
मनातील आपूलकी , तिच्यातील
सहनशीलता ,तिचे प्रेम,तिच्या
बोलण्यातील गोडवा,अशीच तिच्या
जीवाची घालमेल टिपण्याचा
केलेला प्रयत्न.

वसंत ऋतू ,तू आणि मी सोबतीला
ते सूदंर बहरणारी झाडे.वाऱ्यासंगे
हलनारी ती झाडांची पाने
.आकाशातून येणारी ती सूर्याची
सोनेरी किरणे ,पक्ष्यांचा
किलबिलाट, नदीचे निळेशार
पाणी,कोकीळेची ती तालबद्ध
गाणी.

मी त्या टेकडीवरून रवीकडे बघत
असता हळूच येणारा तुझ्या
पावलांचा आवाज... मागे वळून
बघता, तेव्हा तुझ्या चेहेऱ्यावर
आलेलं ते स्मित हास्य,त्या सोनेरी

सूर्य किरणात खुललेला तुझा चेहेरा,त्या सुंदर वातावरणात तुझी नी माझी भेट.भेटायला तू बोलावले होतेस पण आधी मी पोहोचले.तुझी वाट बघत या  रमणीय वातावरणात मी एकरुप झाले.

काय बोलावे?काहीचं सुचेना, फक्त बोलत होते ते डोळे.
तू उभा.
खरचं सारं काही किती रमणीय. बघ वसंत फुलला आहे. ती पळसाची झाडे बघ... तांबूस रगांच्या फुलांनी बहरली.झाडाची पानझळ सुरु झाली. ह्या झाडांनी आपल्यासाठी पानांचा गालीचा अंथरला.नवीन कोवळी पाने झाडावर येवू लागलीत, आपल्या स्वागतासाठी. तुझ्या मनात प्रेमाची पालवी कधी फुटेल?

चेष्टा करणारा वारा जेव्हा मला अलगद स्पर्शून जातो ना तेव्हा आठवतो तूझा लटका राग-आणि माझं तुला प्रेमाने समजावणे परत दोघांनी खळखळून हसणे.निसर्गातील प्रत्येक वस्तूत प्रेम दडलेलं असते. ते शोधण्यासाठी ती प्रेमळ दृष्टी हवी ,झाडेही बोलतात ,फुलेही ते जेव्हा बहरतात ना ते आपल्यासाठी प्रेम व्यक्त करतात. आपण त्यांना व स्वत:लाही समजून घ्यायला हवे.

वसंत ऋतूत व  प्रत्येकच ऋतूत आपलं प्रेम बहरत असावं निसर्गाच्या सानिध्यात. बघ आता सूर्य पण  प्रखर होत चाललायं!! परत तुझं तेचं माझ्या कडे बघून स्मित हास्य पणा तू हा असाचं गप्प का? निघालेय मी ....

ह्या सुंदर वनराईत शब्द ऐकू आले,
सखे!! थांब बघ तो राजहंस पक्ष्यांचा जोडा, पाण्यात कसे शोभून दिसताहेत न बोलताही दोघेही मूकसवांद साधत आहेत तसचं आपल प्रेम !

Your word rules

बघ तो कमळ चिखलात राहून
देखील त्यापासून अलिप्त आहे.
किती छान निरागस निर्मळ,
बघ तो भुंगा त्याला माहीत
आहे,फुलातील रसकण चाखतांना
तो सारे भान विसरून जातो .फुलात
तो बंद होतो तरी त्याचे त्या
फुलावरील प्रेम,सांग ह्यातून तुला
काही कळलं काय की आणखी
सांगू?

ह्या वसंत ऋतूप्रमाणे माझं प्रेम
सदैव तुझ्या सोबत आहे. वसंत ऋतू
मला परत एकदा तुझ्या चेहेऱ्यावर
फुलतांना दिसत आहे.हा असाचं
आयुष्यभर फुलत राहू दे.तुझा हात
माझ्या हातात असाचं राहू दे
समोरचा प्रवास आपण मिळून करू
या.

कळलं मला तुझं प्रेम,वसंत ऋतू
बहरलेला होता पण माझ्या
मनातील, हृदयातील वसंत ऋतू त्या
दिवशी बहरला ज्या दिवशी तू माझा
हात आपल्या हातात घेतलास..

बहरला वसंत ऋतू
निसर्गाच्या सानिध्यात
प्रेम व्यक्त केलेस तू
ह्या हिरव्याकंच वनात.

शेवटी म्हणावसं वाटतं....

हृदयी वसंत फुलतांना
तू असावा सोबतीला....

Your word rules



# जननी

संतोष जगताप

'मॅटर्निटी होम' प्रवेशद्वारावर तिनं पाऊल ठेवलं. केवळ पाऊलच ठेवलं नाही तर ती एका नव्या युगाकडे निघाली होती. तिला असह्य होणाऱ्या वेणादेखील अतीव सुखद रानजाईकडे नेत होत्या. उगवतीची दिशा झुंजूमुंजू व्हावी तशी अनील आभा अंतरात भरायला लागली. त्या प्रसुतीगृहात सण साजरा होणार होता. ते गृह एखादा राऊळासारखे भासायला लागले होते. कुशीतून आदिशक्ती जगतजननी प्रकट व्हावी असे तिला सातत्याने वाटत होते.

तिला प्रसववेदना सुरू झाल्या. जिवाचा आकांत झाला. आकाश पाताळ एक झाले. गर्भातून येणाऱ्या कळांना सोसत तिने एका गोंडस कळीला जन्म दिला. कळीला ? होय कळीलाच! तिच्या संसारवेलीवर फुललेली ती पहिलीवहिली कळी होती. तो कोवळा जीव जेव्हा तिच्या कुशीत आला तेव्हा तिच्या स्तनांतून अपार दुग्धधारा व्हायला लागल्या आणि सोबतच डोळ्यांतून आसवंदेखील. तो मातृत्वाचा विलक्षण सोहळा ती डोळे भरून अनुभवत होती. तिचंच प्रतिरूप तिच्या ओंजळीत आलं होतं जणू. गालावरती तीच इवलीशी खळी, तोच गोरापान गुलाबी वर्ण, तेच टपोर डोळे, जणू तिचेच बालपण तिच्या अंगणात आले होते.

अंगण तर बहरून आलं. पारिजात टपटपत आनंदाने खाली आला. कवठी चाफा खळखळून हसला. जाई जुईंना तर वेडच लागलं होतं. अगदी पानोपानी त्या बोलत होत्या,

Your word rules

फुलत होत्या. ती लेक अवघ्या घराची लाडकी तर झालीच होती परंतु पानाफुलांची देखील सानुली ताई झाली होती. त्या लेकीच्या हसण्याने, रडण्याने, किलकाऱ्यांनी, बोबड्या बोलांनी घर-अंगण दणाणून गेलं. घराच्या वातावरणात सातत्यानं तिच्यावर वत्सल पदर फिरत होता. मातृत्वाची पावले घरभर फिरत होती. कोणत्या जन्माची पुण्याई फळाला आली असावी म्हणून हा क्षण आयुष्यात आला!

ती पालथी पडायला लागली. ती रांगायला लागली. काही दिवसातच ती आधारानं उभी राहायला लागली. तिचे पायावर उभं राहणं स्वतःच्या पायावर उभं राहणं हे अतिशय कौतुकास्पद होतं. तिचं बोलणं वाढलं, बडबडणं वाढलं. गळा अधिक सुरेल व्हायला लागला. बोबड्या बोलांना नवनवीन शब्द गवसायला लागले. मग ती चालायला लागली नव्हे धावायला लागली. बाल मैत्रिणींमध्ये रमायला लागली. तिनं भातुकलीचे नवनवीन खेळ अंगणात मांडायला सुरुवात केली. घरातील खेळण्यांचा पसारा वाढला. घराच्या कोपऱ्या कोपऱ्यात तिच्या सख्ख्या बाहुल्या तिच्या सोबत संवाद साधत होत्या.

तिचा तो खेळण्यांसाठी हट्ट करणं, हट्ट करताना गळ्यात पडणं, लळा लावणं कित्ती कित्ती भारावून टाकणारं होतं. ती अशीच इवलीशी गोजिरी ताई रहावी, तिनं कधीही मोठं होऊ नये असं कधी कधी वाटायचं. परंतु दिवस थांबतात थोडेच! ते तर पंख लेवून अधिकाधिक उंच उडायला लागतात तशीच लेक देखील मोठी मोठी व्हायला लागली. तिची पावलं शाळेत पडायला लागली, अक्षरांची ओळख झाली, गणिताशी गट्टी झाली, कविता मुखपाठ व्हायला लागल्या, गाणी ओठांवर

यायला लागली,
अभ्यासक्रमातील व अभ्यासक्रमाच्या बाहेरील प्रश्न विचारून भंडावून सोडायला लागली. तिच्या काही प्रश्नांना तर उत्तरच नसायचं.
तिच्या कल्पनांचं क्षितीज अधिक विस्तीर्ण व्हायला लागलं. ती विचार करायला लागली. ती लिहायला लागली. ती प्रयोगशील झाली. तिला चांगल्या वाईटाची समज यायला लागली. अक्षरे अधिक वळणदार व्हायला लागली. अभ्यासातील रुची वाढली. हिरिरीने सर्व स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लागली. लेक चंद्रकोरीसारखी दिसामाजी वाढत होती. लेक कधी मोठी होते ते कळत नाही म्हणतात ना! ते अगदी खरं होतं. अगदी नजरेपुढं अनुभवलं. ती कधी मोठी झाली ते कळलंच नाही.

ती निपजतच हुशार. प्राविण्य प्राप्त. गुणवत्ता यादीत अव्वल. वर्षांमागून वर्षे गेली. तिचं माध्यमिक शिक्षण, तीच महाविद्यालय शिक्षण पूर्ण झालं. ती स्वयंसिद्धा झाली. खऱ्या अर्थाने स्वतःच्या पायांवर उभी राहिली. ती आर्थिकदृष्ट्या सक्षम बनली. घराचा आधार बनली. तिनं आजवर जे काही हट्ट करून मागितलं होतं, तेच हट्ट तीघरातील प्रत्येकाला

विचारून विचारून पूर्ण करायला लागली. तिच्याकडून काहीही नको असताना ती अगदी सहजतेने आणून घरातील सदस्यांना आपुलकीने देत होती. तिने आजवर काय दिले नव्हतं? तिने आईला आईपण, पित्याला बापपण, भावाला बहीण, घराला घरपण दिलं होतं.

मग तिच्या आयुष्यात एक राजकुमार आला. अतिशय देखणा, राजबिंडा, हुशार, घरंदाज, सुस्वभावी. प्रत्येकाला आवडेल असा. लेक परक्याचे धन म्हणतात परंतु तसं नाहीये. ती दोन्ही उंबरठ्यांना पावन करणारी अतूट सीमा असते. तशीच ती

आमच्या उंबरठ्यापासून राजकुमाराच्या उंबरठ्यापर्यंत गेली. त्या उंबरठ्यावरील माप ओलांडून तिनं गृहप्रवेश केला. तिच्यासोबत दिलेली संस्काराची शिदोरी तिने त्या घरात उघडली. त्या घरातील सर्वांची मनं जिंकली. ती सर्वांची लाडकी सून झाली.

तिच्या आयुष्यात सुखाचे अगणित क्षण प्रत्येक दिवशी यायला लागले. ती सुखाने संतृप्त व्हायला लागली. राजकुमार तिला पाकळ्यांचा मखमली वाटेवरुन हात धरून फिरवत होता. असेच वर्ष-दीड वर्ष गेले. तिच्या गर्भात नवांकुर उमलला होता. त्या अंकुराची जाणीव तिला झाली तेव्हा तिनं ती गोड बातमी सर्वात अगोदर राजकुमाराच्या कानात सांगितली. तो कोंब प्रत्येक दिवशी वाढायला लागला त्याचं वाढतं सौंदर्य तिच्या शरीरावर दिसायला लागलं होतं. तिचे सर्व गर्भसोहळे दोन्ही घरानं अगदी आनंदानं पार पाडले. दिवस पूर्ण झाले.

एक दिवस पोटात दुखायला लागलं तिच्या. घरात धावाधाव सुरू झाली. तिला गाडीत बसवून तातडीनं मॅटर्निटी होम मध्ये आणलं. ती हळूच गाडीतून उतरली. आणि तिने मॅटर्निटी होमच्या प्रवेशद्वारात पाऊल टाकलं. त्या पावलाने एका वर्तुळाचा प्रवास पूर्ण केला होता.

ते वर्तुळ अनादी होते. वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या चालत आलेला तो पावलांचा प्रवास होता. आणि तो प्रवास असाच अव्याहत सुरू राहणार होता. तिच्या गर्भातील नाळ अशीच जिवंत राहणार होती. ती विश्वासा उदय होती. तिच्या हाती पाळण्याची दोरी होती. ती साक्षात जगज्जननी आहे म्हणूनच प्रत्येक घराचे उंबरठे आज सजलेले आहेत. प्रत्येक अंगणातील तुळस मंजिरींनी बहरलेली आहे.

Your word rules



# फुलली रातराणी

सौ. प्रिया देशपांडे

आज किती दिवसांनी मनस्वी ने आरशात बघितले. केस किती पांढरे दिसत आहेत. आताशी तरुण दिसणारी मी म्हातारी दिसायला लागली. चेहरा निस्तेज.. निर्विकार दिसत आहे.

अरे.. हे काय, आरशात कोण हसत आहे मला? आवाज तर तनयचा.. अग वेडा बाई किती आळशी आहात तुम्ही. केसांना डाय लावा जरा. अहो अजून तुम्ही पन्नाशीच्या नाही झाल्या .दोन महिने बाकी आहेत.लक्ष द्या स्वत:कडे.

अरे वेड्या.. माझ्यावर इतकेच प्रेम होते तर का मला सोडून गेलास मनस्वी ओरडली. माझे टापटीप राहणे,चांगले दिसणे तुला आवडायचे नं, मग का केले असे? मला, मुलींना का सोडून गेलास. काय दोष होता आमचा? किती सहज हे सुंदर बंधन तोडले.

तुला माहित आहे का समाज काय म्हणतोय. ..
आपलेच जवळचे लोक-परवा दुकानात गेली तर तुझ्या मित्राची बायको दिसली.बघून न बघितल्या सारखे केले तिने. मी बघितले तर किंचित हसली.दबक्या आवाजात हळूच बोलत होती. सोबत मैत्रीणी होत्या.
दिसायला तर छान आहे बाई,मग नवरा का सोडून गेला असेल ?
दुसरी म्हणाली, असा भरलेला संसार कुणीही सोडत नाही,बाईचाच काही दोष असावा.घरात सर्व वैभव आहे. मागच्या हळदीकुंकवाला बघितले मी.

अहो,घरात प्रेम नाही मिळाले तर माणूस भरकटतो असा.
यंदा हळदीकुंकवाला बोलवायचे कि नाही कळत नाही.
अग चला लवकर.. तयारी बाकी आहे, कुणीतरी बोलले.
हो..हो.. चला. त्या निघून गेल्या.

त्यांचे ते तप्त सूर कानावर आदळत होते. कशीतरी घरी आली.
ओक्साबोक्सी रडायला लागली.
मुली धावत आल्या. रडायचे कारण विचारु लागल्या. न सांगता त्यांना कळले सारे.

तुझे असे वागणे कल्पनेपेक्षा भयानक होते. तुझ्या वागण्यातून तसे कळत होते पण मुलींच्या प्रेमापेक्षा ती परकी स्त्री तुला जवळची वाटली. मी तर तुझ्या आयुष्यात किती स्थान मिळवले होते ते तुलाच माहीत. मी मात्र तुझ्या प्रेमात वेडी होती. माझा शेवटचा श्वास सुध्दा तुला न विचारता सोडला नसता. तुझ्या त्या दिखाऊ गोडबोलण्यात दंग होते मी.

अरे केसांना डाय सुध्दा तु जेव्हा चिडवायचा तेव्हा करायचे.
तुझ्या प्रेमात किती वेडी बनले होते मी.मुर्ख होती मी. एखाद्या वेली सारखी तुझ्या आधारासाठी धडपडत होते.खरेच किती सुंदर आयुष्य होते आपले.हास्याने खळखळ करणारे आपले आयुष्य तुझ्या निर्णयाने स्तब्ध झाले.
आपल्या उमलत्या कोवळ्या कळ्या आपल्या कोषात बंद झाल्या. काय मिळाले रे तुला?

आता हळूहळू त्यांनी तुझ्याविना आंनदी राहणे सुरु केले आहे.. मी पण प्रयत्न करत आहे. वेळ लागेल थोडा पण आता जगायचे तर आत्मसन्मानाने. माझे अस्तित्व शोधायचे मला. मलाही आहेत भावना. स्वच्छंदी, फुलपाखरू बनून उंच भरारी घेणार मी.
बस् झाली आता अवहेलना.
तुझ्या बेभान वागण्याची शिक्षा मी का भोगायची..माझा काय

गुन्हा रे ?
चुकला तूच.पण समाज मला
गुन्हेगार ठरवत आहे.
माझ्या कर्तव्यात चुका काढत
आहेत.पण आता बस्स...

अग आई.. काय करते ग बाहेर?
काही नाही बेटा.. रातराणीच्या
सुगंधात बसून आहे. आता उर्वरित
आयुष्य असेच  सुंगधी जगायचे
आहे, भरभरून आंनदाने
दरवळणारे.

उंच भरारी गगनी घेऊन
चंद्र, तारे  मुठीत पकडून
अस्तित्व मिटलेले शोधून
फुलासवे मी फुलेन......

Your word rules



# गुरुदक्षिणा

सौ. प्रिया देशपांडे

गेल्या काही दिवसात सुमीच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक चिन्ह शेखरला जाणवत होतं. तिची अस्वस्थता त्यानं बरोबर हेरली होती. एका रात्री त्यानं तिला विचारलं,

"सुमती, हल्ली फार अस्वस्थ दिसतेस? काही त्रास जाणवतो का तुला?"

"नाही रे..!विशेष काही नाही, हो पण एक दोन वेळा माझे एक गुरुजी सबनीस सर माझ्या उगाच स्वप्नात येऊन गेले,शाळा दिसली,आणि ते दिवस आठवले, सर आता खूप थकले असतील,ते कसे असतील?एवढ्या वर्षानंतर आज स्वप्नात येण्याचं काय कारण? त्यांना माझी आठवण कशी आली असेल? याचा सतत विचार येतो आहे मनात...!"

शेखरने तिला जवळ घेतले... अन किती काळजी करतेस ग एखाद्या गोष्टीची? आपण एखाद्या रविवारी जाऊन भेटून येऊ या का त्यांना? नाहीतर असं करू, ५ सप्टेंबर ला शिक्षकदिन आहे तेव्हाच जाऊ म्हणजे छान योगायोग होईल. शेखरने हा सुखद धक्का देताच ती त्याच्या खांद्यावर विसावली.

कोळकानडी, जिल्हा बीड ,छोटा गाव.तिथं सुमतीच शिक्षण झालं होतं. चावडीवर शाळा भरत असे. आणि मागच्या खोलीत सबनीस सर चं बिऱ्हाड. नंतर,नंतर पाटलाच्या

वाड्यात त्यांना एक,दोन रुमचं घर दिल होतं, पंचायतीच्या सल्ल्यानुसार. सबनीस सर ,त्यांची बायको आणि एक मुलगा.पण देवाने त्याला कमी वयातच बोलावून घेतले हे दुःख सबनीस सरांच्या

नशिबी आलं होतं.ते आतून कोलमडले होते.पण पत्नीकडे पाहून सारे काही निमूटपणे सहन करत होते. गुरुजींचं गणित खूप पक्क होतं. ते रागीट मुळीच नव्हते. प्रत्येक विद्यार्थ्यांसोबत अगदी सलगीनं वागत होते ते, म्हणून सर्वांचे लाडके होते.

धोतर, अंगरखा,काळी टोपी असा टिपिकल पोशाख त्यांचा.त्यावेळी सुमीला शाळेतली सुकडी खूप मनातून आवडायची म्हणून ते सुमीसाठी राखून ठेवायचे.बाबाप्रमाणे माया करायचे ते सुमीवर.गुरुजींनी गणिताची शिक्षा म्हणून सुमीला त्यांच्या घरी चुलीवर पोळ्या करायला लावल्या होत्या तो क्षण ती कधीही विसरू शकली नाही.कारण त्या दिवशीच ती पहिल्यांदा पोळ्या करायला शिकली होती आणि ही गोष्ट तिच्या कायम स्मरणात राहणारी होती. म्हणून सबनीस सर तिच्या आयुष्यातून कधीही वजा होणारे नव्हते. आणि गुरुजीमुळेच ती गणिताची उत्तम शिक्षिका होऊ शकली होती हे विशेष.

आज कित्येक वर्षांनी दोन वेळा अचानक सबनीस सर स्वप्नात आलेत.आता ते थकले असतील,ओळखतील तरी का मला?मी त्यांच्या लक्षात तरी असेल का?

कित्येक प्रश्नांची इमारत बांधली गेली होती तिच्यापुढे...आता मनाने ठरवलेच की, शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुजींची भेट घ्यायचीच. असेही कोरोनाचा काळ आता ओसरून सारे काही सुरळीत झाले आहे.

४ सप्टेंबर च्या रात्री शेखर आणि सुमती पुण्याहून निघाले.रात्रीचा प्रवास.दिवसभर तिची धावपळ सुरू होती. गुरुजींना ओल्या नारळाच्या वड्या आवडायच्या. त्या तिने आठवणीने करून घेतल्या,त्यांच्यासाठी भेट म्हणून 'तुकाराम गाथा' घेतली, एक सुंदर बनारसी शाल घेतली.खजूर,पोथी

Your word rules

ठेवायला सागवानी लाकडी स्टँड अशा कितीतरी वस्तू तिने आठवणीने घेतल्या,एक वेगळ्या उत्साहात ती प्रवासास निघाली.आपला नवरा खास आपल्या शिक्षकांच्या भेटीस घेऊन आहे याचे तिला मनोमन कौतुक वाटले आणि अर्थात अभिमान सुद्धा.

प्रवासास निघाल्यापासून सुमतीच्या नजरेसमोरून सारं बालपण जात होतं.झाडांच्या बरोबरीने आठवणीही धावत होत्या. रस्ता नवीन वाटत होतं,मोठमोठया दुतर्फा झाडानी भरल्या होत्या.वृक्षारोपण मोहीम जोरात राबवली गेली होती,सारं पाहून तिला भरून येत होतं. विचारात तिला कानडी कधी आलं ते कळलंच नाही,आता सकाळचे ६ वाजले होते.उगवत्या सुर्यासोबत आठवणीही ताज्या झाल्या होत्या. २ खोल्याच्या जागी आता शाळेची इमारत बनली होती.मातीची घरे बदलून सिमेंट -काँक्रेट चे बंगले बनले होते . आता सकाळचे ६वाजले होते. ती सारं काही पाहतच राहिली. एवढ्यात गाडी पाटलाच्या वाड्याजवळ येऊन थांबली.

गाडीचा आवाज ऐकताच जख्ख म्हातारे झालेले , झाडाची फुले तोडत असलेल्या गुरुजींनी चष्माच्या काचातुन मान हलवत रोखून पाहिले. ओळखणे तर शक्यच नव्हते.सुमती आणि शेखर जवळ गेले.एवढ्यात गुरुजींनीच विचारले,"कोण आपण?माझी नजर आता कमजोर झाली आहे." "सर, मी सुमती.....!तुमची सुमु, सुमती कुलकर्णी,पोळ्या करायला शिकवला होतात तुम्ही मला.२० वर्षांपूर्वीची तुमची विद्यार्थिनी."

गुरुजी वयाने थकले असले तरी मनाने तरुण होते अजूनही.त्यांना लगेच आठवले, हं......सुमी,परकर पोलक्यातली सुमी.इतके वर्षांनी तुला माझी म्हाताऱ्याच्या कशी ग आठवण झाली?बोलतांनाच त्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं.पण त्यांना मनस्वी आनंद झाला होता.तो त्यांच्या फक्त नजरेतून व्यक्त होत होता.

"चल, घरात चल...! तुझे यजमान छान आहेत हो. राजबिंडा दिसतोय पोऱ्या. सुमी मनात हसत गुरुजींच्या मागे आत गेली.प्रवेश करताच घर उदास भासले,गृह लक्ष्मीची तसबीर भिंतीवर लटकलेली दिसली. सुमी पाहताच राहिली,"सर, हे कधी झालं?"

सरांच्या डोळ्याला पुन्हा धारा लागल्या.कोरोनाचे पहिल्या लाटेत ती शेवटच्या टप्प्यात सोडून गेल्याचे गुरुजींनी सांगितले.सुमती गुरुजींच्या जवळ गेली, त्यांना वाकून नमस्कार केला.तिच्या डोळ्यात अश्रू गुरुजींच्या पायावर पडले.यातच त्यांनी सारे जाणून घेतले.

"सर,आता मी आली आहे ना...! तुमची मुलगी सुमु...आता डोळ्यात पाणी नको.गुरुजींनी पाय मागे घेतले,
"नको ग, दूरच बसा, मलाही दोन दिवसापासून ताप येतो आहे,खोकला येतो आहे. हा कोरोना कोणाला कधी गिळले सांगता येत नाही.तू बस इथे.जावई,बसा ना..!"

खूप बरं झालं,आपण सुमती ला घेऊन आलो ते,असे शेखरला वाटले. गुरुजींच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.तिने पिशवीतून शाल काढून त्यांच्या अंगावर पांघरली,तसे त्यांना गहिवरून आले.तिने खोबऱ्याची वडी काढून हातावर ठेवली,

"तुम्हाला आवडतात ना खोबऱ्याच्या वड्या,म्हणून मुद्दाम करून आणल्यात सर..! आणि ही 'तुकाराम गाथा' शेखर कडून भेट." आता तर त्यांचा अश्रूंचा बांध फुटला.मधेच खोकल्याची ढास लागून उबळ येत होती.तिने अंगाला हात लावून पाहिले,तर अंग चांगलेच तापलेले होते.त्यांना दवाखान्यात नेण्याची गरज होती.त्यांना एकटेपणाचा जास्त त्रास होत

होता.त्यांच्या मायेनं सुमीला त्यांची मुलगीच बनवलं होतं. या क्षणी तिने कोणताही विचार न करता गुरुजींना गाडीत बसवून हॉस्पिटलमध्ये आणले.तेव्हा सर्व चाचण्या झाल्यावर तेही कोरोनाचे

Your word rules

रुग्ण असल्याचे डॉ.नी जाहीर केले.याही अवस्थेत सुमीने गुरुजींना एकटे सोडले नाही.डॉ ची परवानगी आणि स्वतःच्या जबाबदारीवर ती गुरुजी सोबत राहिली. त्यांच्या सोबतच कित्येक रुग्णाची मदत केली.एक स्त्री मध्ये वेळेनूसार आलेली ही हिम्मत कौतुकास्पद

होती.कुणाचेही नातेवाईक जवळ नसताना सुमती देवदूत होऊन मदतीला धावत होती.

असेच दोन दिवस धावपळीत गेले.आणि आज शेखरच्या ही अंगात कण कण जाणवली,सतत च्या ड्रायव्हिंग मुळे त्याची फार दगदग झाली होती.त्वरित शेखरच्या तपासण्या करता तोही गुरुजींच्या संपर्कात येऊन पॉझिटिव्ह निघाला होता.आता मात्र सुमती मनोमन घाबरली होती.दोघंही दोन बेड वर पाहून तिचा धीर खचला होता. ण एक स्त्री जेवढी हळवी तेवढीच कणखर सुद्धा असते हे दृश्य

इथे पाहायलाप मिळाले.तिच्यावर आलेले हे संकट आता तिला जीवघेणे वाटू लागले.आता काय करायचे या विचारात असतानाच नर्स चा आवाज आला," बेड नंबर ४ चे नातेवाईक..?"

सुमी गुरुजींजवळ आली,तेव्हा ते फक्त तिच्याकडे पाहून रडू लागले.त्यांचे फक्त अश्रू सारं काही सांगून जात होते त्यांच्या मनातलं. सुमती मनाने भित्री नव्हती पण शेखर ला बेड वर पाहून तिला अपराधी वाटू लागलं आता.असे तिचे कसरतीचे दिवस होते हे.पण ती ने जराही आत्मविश्वास ढळू दिला नाही.या प्रसंगाला सुमीने धीराने एकटीने तोंड दिले.दिवस रात्र एक करून तिने एकाच वेळी दोघांची सेवा केली.आणि शेवटी मरणाच्या दाढेतून गुरुजीना आणि आपल्या सत्यवानाला तिने परत आणले.डॉ ना जेव्हा समजलं सुमी गुरुजींची विद्यार्थिनी आहे तेव्हा सुमी ला 'कोरोना योद्धा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिचा आदर्श कोणीही घ्यावा अशी सुमी
.


Your word rules

आज खऱ्या अर्थाने जिंकली होती. आणि गुरुजींना पुनर्जन्माची 'गुरुदक्षिणा' तिने दिली होती.

गुरुजींना घेऊन ती पुढे पुण्यात आली.आणि गुरुजींना नवजीवन मिळाले.

एक स्त्री मनात आले तर काहीही करू शकते याची प्रचिती आली

Your word rules



# पसंती

सौ. दर्शना भुरे

श्यामलीला साडी प्रेस करताना
बघून  आई म्हणाली,
श्यामल ..ही साडी नको नेसू.  ..
मागच्या वेळी  सुध्दा तू हीच
घातली होती.
का ग?  साडीवरून अलगदपणे
हात फिरवत  श्यामल तिच्या
आईला म्हणाली.
 अग हा रंग तुझ्या सावळ्या
वर्णाला   खुलून  दिसत नाही.

 हे काय ग आई प्रत्येक वेळी
मला मुलगा पाहायला येते वेळी
तुझे श्यामल.. ही साडी नेस , ही
नको, अशी चाल, अशी  बस,
अशी उठ, हे कर, हे नको...मी
शोभेची बाहुली आहे का ?मला
खरचं वैताग येतो आहे  आता या
सगळ्यांचा.. श्यामलीची
चिडचिड ऐकून आई तिला
म्हणाली,

अग लोक मुलीलाच नावे ठेवतात
ग...
आणि मुलाला...त्याचे काय ग
आई...तो कसाही चालतो का?
मागच्या वेळी आलेला मुलगा
बघितला. स्वत: किती काळा होता
आणि त्याला बायको मात्र
गोरीपान हवी..काय तर म्हणे
सरकारी नोकरी...केवढा रुबाब
दाखवत होता. बरे
झाले...त्यांच्याकडूनच नकार
आला तसा मलाही पसंतच नव्हता
म्हणा...आणि त्याच्या मागच्या
वेळेसही..

आता हे सर्व काढायची वेळ नाही
आहे
श्यामल बरीच कामे
पडलीत...मुलाकडील मंडळी
केव्हाही पोहोचेल. तयार हो
पटकन..
तिघी बहिणींमध्ये श्यामल  सर्वात

लहान .. सावळ्या वर्णाची म्हणून तिला लाडाने श्यामली नाव पडलेले..

श्यामलीने ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण पूर्ण करुन नंतर फॅशन डिझायनर चा कोर्स केला आणि स्वतः चे बुटीक उघडले.. त्यातून तिची कमाई छान होत होती. सर्वांची मन जपणारी सर्वांची लाडकी, गुणवान , ...पण तिच्या गुणापेक्षा तिच्या सावळ्या रंगालाच पाहूनच तिला गृहीत धरले जात होते.

श्यामलच्या दोन्ही बहीणींचे लग्न योग्य वयात झालेले ..पण शामलीला तिच्या सावळ्या रंगामुळे अवघड जात होते. त्यामुळे आईची तिच्या लग्नाविषयीची काळजी आता दिवसेंदिवस वाढतच चालली होती.

श्यामलीचे योग्य वेळी लग्न जुळावे म्हणून आता आईने देवधर्मांचा आधार घ्यायला सुरुवात केली होती. कडक व्रत उपवास चालू केले.

श्यामलीच्या बाबाला हे सर्व सोपस्कार पसंत नव्हते. ते आईला समजवत,
अग ..निर्मला मला पण आपल्या श्यामलीची काळजी नाही असे वाटते का तुला...
नशिबावर विश्वास ठेव.. बघ सगळे चांगले होईल आपल्या मुलीचे.. तिच्या रूपापेक्षा तिच्या गुणाची कदर करणारा नक्की भेटेल बघ तिला..
तू असे व्रत उपवास करून उगाच स्वतः ची तब्येत बिघडवून घेशील...

तेव्हा आई विषय टाळून गप्प राहणेच पसंत करी
तिला वाटे पुरुष काय कामानिमित्त दिवसभर बाहेर गुंतून राहतो. पण बाईचे काय? सर्वांच्या कुत्सित नजरा..आल्या गेलेल्यांना सर्वांना तिलाच तोंड द्यावे लागते. चार बायकांत उठणे बसणे मुश्किल होते.

आज येणाऱ्या मुलाची तरी पसंती माझ्या श्यामलला येवू दे असे ती मनोमन देवाला आळवू लागली. ठरल्याप्रमाणे मुलाकडील मंडळी

Your word rules

श्यामलीला पाहण्यासाठी आली.
श्यामलीने सर्व पाहुण्यांना चहा पोहे दिल्या नंतर नेहमी सारखी स्वत:ची ओळख करून दिली. बऱ्याच वेळापर्यंत बसून मुलाकडील मंडळी दोन दिवसांत कळवतो असे आश्वासन देऊन निघून गेली. शिकलेला नोकरदार मुलगा...आईला पसंत पडला होता.

पाहुणे घराबाहेर पडताच...श्यामलीला तिच्या खोलीत जाताना बघून आई बाबाला हळूच म्हणाली,
"अहो छान आहे ना मुलगा..तुम्हाला काय वाटते पसंती येईल ना आपल्या श्यामलीला यावेळी तरी"
आई पण ना..

माझा सावळा रंग सोडून माझ्यात काय कमी आहे. शिकलेसवरले स्वतः च्या पायावर राहिले घरातील सर्व कामेही उत्तम जमतात. पण तरीही
माझ्या बाबतीत असे का? मी एक स्त्री आहे म्हणून मला मन नाही का भावना नाहीत का स्वतः ची आवडनिवड नाही..आता यापुढे मला माझे स्वतः चे प्रदर्शन मांडायचे नाही.
आई बाबाला बोलून बघू का?
बाबा एकवेळ समजून घेतील पण आई नाही घेणार....नको आताच तर पाहुणे घराबाहेर पडली बघू दोन दिवस अजून वाट तिच्या मनात अक्षरशः घालमेल सुरू झाली होती.

तिला एकदम तिची मैत्रीण रेणू आठवली रेणूने दोन दिवसांपूर्वीच तिला काही कामानिमित्ताने माहेरी येणार असल्याचा फोन केला असल्याचे पाहुणे येण्याच्या गडबडीत ती पूर्णपणे विसरली होती.

आता रेणू कडे जावून जरा वेळ बसले तिला बोलले तर थोडे मन हलके होईल..
या विचाराने तिने केसांवरून कंगवा फिरवून थोडीशी पावडर लावली व आरशासमोर उभी राहत स्वतः वरून एक नजर टाकून स्वयंपाकघरात असलेल्या तिच्या आईला रेणूला भेटण्यासाठी जात असल्याचे

सांगून पायात चप्पल सरकवून घराबाहेर पडली. श्यामली सोडून बाकी जवळपास सर्व मैत्रींणीचे लग्न झालेले..

रेणूसोबतची तिची शाळेपासूनची दाट मैत्री ..लग्नानंतर रेणू तिच्या संसारात गुरफटली आणि श्यामली तिच्या व्यवसायात.. तसे फोनवर बोलणे होत होते पण आज कितीतरी दिवसांनी दोघी मैत्रीणी समोरासमोर खोलीत बसून मनसोक्त गप्पा मारत होत्या.

बाहेरील दिवाणखाण्यातून पाहुणे मंडळींच्या हसण्या, बोलण्याचे आवाज कानावर पडत होते.
त्या सर्व आवाजाने श्यामलीचे लक्ष वेधून घेतले.तिला हा आवाज नक्कीच कुठे तरी ऐकल्यासारखा वाटत होता. पण कुठे ? तिला काही आठवत नव्हते.
म्हणून मग तिने रेणूलाच विचारले तर रेणू म्हणाली,
"अग..माझा दिर आहे - अविनाश. सुधीरच्या मामाचा मुलगा.. या वर्षी त्याच लग्न करायचे आहे. त्याला लग्नासाठी मुली पाहत आहेत नुकताच एक मुलगी बघून आला त्यावर बोलणी चालू आहे. हा अविनाश छान आहे बर का...नोकरी पण आहे "
रेणू पुढे म्हणाली,
"अग...हो श्यामली मी विसरलेच...तुला पण पाहायला पाहुणे येणार होते न मग कसा आहे मुलगा आवडला का तुला?"

पण शामलचे तिच्या बोलण्याकडे लक्ष नसल्याने पाहून रेणूने तिचा हात हातात घेऊन तिला परत विचारले,
"अग...श्यामली मी काय विचारत आहे?"
"जावू दे ग..वैताग येतो हल्ली या सगळ्या गोष्टींचा"
म्हणजे..
अग मी पडले मुलीची जात मी काय बोलणार रेणू माझे मत कोण विचारात घेते. मुलाकडील मंडळीने होकार द्यायचा आणि मी फक्त मान हलवून माझी पसंती द्यायची...

Your word rules

श्यामली पुढे हळवी होत म्हणाली,
माझा वर्ण रेणू...माझ्या सावळ्या वर्णाला बघूनच नाकारतात..
अग.. सावळा रंग वगळता काय कमी आहे तुझ्यात श्यामली तू हुशार, कर्तुत्ववान आहे
उद्योगी आहे.तुझा स्वतः चा चांगला व्यवसाय आहे. एवढे सर्व चांगले गुण न पाहता रूप रंग पाहतात
खरेच किव येते ग अशा लोकांची..
पण तू अशी उदास नको होवू तुझ्या गुणाची कदर करणारा लवकरच तुला भेटेल बघ..
माझे एवढे चांगले नशीब नाही ग.
का नाही?अग तुला माहीत आहे माझ्या दिराने आज एक मुलगी पसंत केली. खरे तर आज तो तिलाच बघायला गेला होता. आणि तिला लगेच पसंत पण केली...
एका पाहणीत पसंती- खरंच नशिबवान आहे मुलगी..गोरी पान असेल मग श्यामली दिर्घ श्वास सोडत रेणूला म्हणाली,

गोरीपान नाही पण मनाने सुंदर आहे. गुणी, हुशार आहे. दादाच्या लग्नातच तिला मी पाहिले होते तेव्हापासूनच मनात होती माझ्या हो की नाही हो वहिनी..
श्यामलीने चमकून वर पाहिले तर समोर तोच उभा होता. जो आज तिला घरी बघण्यासाठी आला होता.

हा इथे काय करतो? श्यामल त्याला तिच्या समोर असा अचानक उभा राहिलेला पाहून गोंधळून गेली..
श्यामलीला अशा गोंधळलेल्या अवस्थेत बघून रेणू फिरकी घेत तिला म्हणाली,मी तुला ज्याच्याविषयी बोलत होती ना तो हाच अविनाश माझा दिर ..यानेच आज एक मुलगी बघितली..
तसे...मी पण...माझ्या दिरासोबत आज मुलगी बघण्यासाठी जाणारच होते पण सरप्राईज द्यावे म्हंटले एका मुलीला..
हो ना..भाऊजी आणि आज तिच्या घरीपण पसंती कळवणार आहोत बरं आम्ही लवकरच
श्यामलीला लाजेने चूर झालेले पाहून रेणू तिला आणखी चिडवत म्हणाली,

मग सांगा कसे वाटले सरप्राईज...
आवडला न माझा दिर...कळवू
का घरी आईबाबाला तुमची
पसंती जाऊबाई..

Your word rules



# एक नवी सुरुवात

स्मिता भोस्कर चिद्रवार.

आज खूप वर्षांनी रमाताई ला भेटणार होते.ही तशी माझ्यापेक्षा वयाने थोडी मोठी , स्वभावाने खुपचं साधी , फारशी न शिकलेली अशी ही माझी दूरची बहीण.तिच्या घरी पोचल्याबरोबर तिने छान स्वागत केलं.

काही वर्षांपूर्वी अगदी काकूबाई दिसणारी रमाताई आज मात्र खूपच नेटकी  आणि टापटीप दिसत होती .तिचं वय वाढण्याऐवजी कमीच दिसत होतं.तिच्या सासूच्या चेहेऱ्यावरची नाराजी स्पष्ट दिसत होती पण तिकडे दुर्लक्ष करून आमच्या गप्पा सुरु होत्या.

थोड्या वेळाने आम्ही रमाताईच्या रूम मध्ये गेलो , आणि बघते ते काय , अनेक पेटिंग्ज , शो पिसेस , विणकाम , भरतकाम केलेल्या वस्तू आणि बाल्कनी मध्ये सुंदर नक्षीदार कुंड्यांमध्ये विविधप्रकारची झाडे, इतक्या सुंदर सुंदर वस्तू पाहण्यात मी दंग होते.

तितक्यात रमाताईने एक आमंत्रण पत्रिका हातात ठेवली निशाताईच्या ' रमास् क्रीएशन्स ' च भव्य प्रदर्शन.

"नक्की ये ग"

या रमाताई चा शब्दांनी मी पुरती गोंधळून गेले होते .अनेक प्रश्न डोक्यात गुंता होऊन ओठापर्यंत येणार तेवढ्यात रमाताई गोड हसली.म्हणाली.

अग हो हो अशी बावरून जाऊ नकोस मी तुझी तीच ताई आहे ,पण आता स्वत:साठीही जगतेय,

Your word rules

त्याचीच ही सुंदर भेट मला मिळाली आहे .देवानं दिलेलं आपलं आयुष्यं आपण नेहेमी दुसर्यांसाठीच जगतो पण स्वत:साठी थोडासा वेळ मी काढू लागले आणि बघ किती छान झालंय माझं आयुष्य.

माझा गोंधळ काही संपत नव्हता तेव्हा ताई म्हणाली ,आता ऐक तुझ्या 'काकुबाई ' रमाताई पासून ' रमास् क्रीएशन्स ' च्या ओनर पर्यंतच्या प्रवासाची गोष्ट.

माझं लग्न झालं तेव्हा सुरवातीचे काही दिवस खूपच कठीण गेले.माहेरी खूप मोकळं वातावरण पण इकडे सगळा आनंदी आनंद.सगळ्यांची तोंडं वेगळ्या दिशेला, खाण्या पिण्याच्या आवडी निवडी वेगळ्या,स्वभाव निराळे आणि एकुलती एक सून म्हणून ते सगळं सांभाळण्याची जवाबदारी माझीच.मुलगा झाल्यावर तर अगदी तारेवरची कसरत व्हायची माझी. कोणाला त्याचं काही सोयरसुतक नव्हतं .संसाराच्या चक्रात अशी काही अडकून गेले की आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत ही भावनाच संपली.पण

मग सांगा कसे वाटले सरप्राईज... काही वर्षांनी मुलं मोठी झाली आणि खूप एकटं एकटं वाटू लागलं .फारशी शिकलेली नाही त्यामुळे नोकरी वगेरे करण्याचा प्रश्नच नव्हता.नैराश्याने पुरती ग्रासून गेले होते .काय होतंय काही कळत नव्हतं .संसार अगदी सुखाचा होता ,कशाचीही ददात नव्हती ,पण असं का होतंय हे समजत नव्हतं.

एक दिवस सहज एक कविता सुचली मी ती काही मैत्रीणींना पाठवली.त्यांनी खूपच प्रोत्साहन दिलं आणि माझं लिहिणं हळूहळू सुरू झालं.माझ्या छोट्याशा बागेत खूप झाडं होती मग त्यातल्या कुंड्यावर मी काहीतरी कलाकुसर करू लागले .वेळ छानच जाऊ लागला पण घरातील कामात दुर्लक्ष होऊनही चालणार नव्हतं, म्हणून मी रोज स्वत:साठी फक्त एक तास काढायचा ठरवला.

Your word rules

सुरुवातीला अवघड गेलं , कारण खरंच आपण स्वतः साठी कधीच वेळ काढत नाही. पण ठरवलं की होतं या नियमाने रोज मी फक्त एक तास स्वतः साठी काढला .
कधी पेंटिंग्ज ,कधी भरतकाम, नक्षीकाम असं करत गेले आणि थोडंफार लिहिणं ही सुरू होतं .एक दिवस माझ्या मुलाने मला स्वतः चा ब्लॉग सुरू करण्याची प्रेरणा दिली. मग काय जोरात कामाला लागले आणि छान प्रतिसाद मिळू लागला.

भरतकाम आणि इतर शो पिसेस च्या ऑर्डर्स घ्यायला सुरुवात झाली ...आणि अचानक सगळ्यांचा माझ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलुनच गेला. सगळ्यांच्या कौतुकाच्या बरसातीत मी अगदी न्हाऊन गेले आणि खरंच आयुष्य बदलूनच गेलं.

आता ना मला सासूबाई च्या टोमण्यांचं काही वाटत ,ना नवरोबाच्या रागाचं , मी ही माणूसच आहे ना काही चुकलं आणि कोणी काही बोललं तरी त्यांचा राग नाही येत .म्हणतात ना ' स्वतः बदला जग बदलेल! '
आता खरंच मी बदललेय , स्वतः साठीही जगायला शिकले आहे . खरंच सांगतेय यामुळे जो आदर सन्मान मिळतोय ना तो अवर्णनीयच आहे .आपल्या मुलाच्या , नवऱ्याच्या डोळ्यात हा आनंद आणि अभिमान पाहण्याचं सुख काही वेगळंच.

आपण स्त्रिया नेहेमी आपल्या घरच्यांच्या आनंदात आपला आनंद मानतो आणि आपणही आनंदी आहोत , हे स्वतःला पटवत राहतो .पण खरंच प्रत्येकाची एक वेगळी स्पेस नक्की असायला हवी , आपणही एक स्वतंत्र व्यक्ती आहोत हे विसरून कसं चालेल? आणि एक नेहेमी लक्षात ठेव आपण जर आनंदी असलो ना तरच आपलं घरही आनंदी राहतं बरं का ! ह्याची प्रचिती मला जरा उशिराने का होईना पण आली.आणि तेव्हापासूनचा हा प्रवास रोज वेगळी अनुभूती देणारा ठरला.
आणि स्वतःवर प्रेम करता करता

बाकीच्यांवरही आपण जास्त प्रेम करतो आणि आपल्याही नकळत आपण बदलून जातो ...छान घरासोबतच स्वतःलाही छान रूपातच पाहून ..."

मी भारावून रमाताईच्या बोलण्यात आणि सोबतच माझाही असा बदलेला भविष्यकाळ रंगवण्यात दंग असतानाच काही बायका आणि मुली तिथे आल्या . एकंदरीतच त्या सगळ्या झोपडपट्टीतल्या वाटत होत्या .रमाताईने त्यांचं तोंडभरून स्वागत केलं आणि मला म्हणाली आजचा तास ह्यांच्यासोबत , मी ह्यांना शिकवते लिहिणे वाचणे आणि काही कलाही .
अगं ह्या सगळ्या  माझ्या च्या मदतनीस म्हणून ही माझ्या सोबत असतात .आम्ही सगळ्या मिळून मोठे मोठे एक्झिबिशन भरवतो आणि त्यामुळे चांगली कमाईही होते.
रोज सगळ्या मिळून आमच्या या एका तासात नवीन नवीन गोष्टीही एकमेकींना शिकवतो .असे माझे अनेक ग्रुप्स आहेत.महिन्यातून एकदा सगळ्या एकत्र येतो.हिंडतो फिरतो आणि मज्जा ही करतो.सोबतच मी आता माझ्यासरख्या नैराश्याच्या छायेत जाऊ पाहणाऱ्या अनेक सख्याना कौन्सिलिंग करून त्यांनाही त्यांची नवीन स्पेस मिळवून देण्याचा चंग बांधलाय.

अगदी भारावून मी रमाताईचा निरोप घेऊन  घरी निघाले , एक वेगळीच ऊर्जा घेऊन ...

सहज मागे वळून पाहिलं , त्या सगळ्या जणी अगदी तल्लीन होऊन आपला आनंद जपत होत्या. एका साध्याशा कमी शिकलेल्या स्त्रीने स्वतःला ओळखलं होतं.आणि स्वतःच अस्तित्व जपत आता इतरांनाही आनंदाने आणि मानाने जगण्याची प्रेरणा देत त्यांचही आयुष्य घडवण्यासाठी मदत करते आहे.

आज मला रमाताईची बहीण असल्याचा खूप आनंद आणि अभिमान वाटतोय.तिच्यासारखं स्वतःच अस्तित्व जपण्याचा आणि इतरांनाही होईल तशी मदत करण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहे.

Your word rules

# लेख





# महिला दिन – एक दृष्टीक्षेप

रागिणी पवार

जागतिक महिला दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

खरं तर एखाद्याच्या हक्कावरती गदा आणणे हे बाधक तर आहेच पण त्याहून जास्त जाचक आहे. मग तो हक्क मतदानाचा असो किंवा मत मांडण्याचा.

या दिवसाचा इतिहास जर पाहिला तर असे लक्षात येईल की पाश्चात्य राष्ट्रांमध्ये महिलांना मतदानाचा हक्क नव्हता आणि तो मिळवण्यासाठी तेथील महिलांनी लढा दिला, त्यामध्ये त्या यशस्वी देखील झाल्या.
पण मनात एक प्रश्न राहून जातो खरंच त्या यशस्वी झाल्या का?

जरा भारतातील परिस्थिती वर नजर टाकू या.
भारतीय महिलांना मतदानाचा हक्क घटनेने दिला,यासाठी आपल्याला संघर्ष करायची वेळ आली नाही. भारत स्वतंत्र झाल्यावर राज्यघटना अमलात आली, त्या दिवसापासून स्त्री आणि पुरुष यांना सर्वच बाबतीत समान अधिकार देण्यात आले. पण या अधिकारांचा भल्यासाठी वापर कसा करायचा हे ना पुरुषांनी सांगितलं ना महिलांनी त्याबाबतीत हिरीरीने ध्यास घेतला.

शिक्षणाचा हक्क मिळवण्यासाठी मात्र तत्कालीन महिलांना बरेच कष्ट

घेतले.म्हणून आज आपण शिक्षणापासून वंचित राहिलो नाही.पण शिक्षणामुळे ज्या जाणिवा जागृत व्हायला हव्या होत्या त्या झाल्या का ? तर अर्थातच,नाही..!

अजूनही भारतीय स्त्री बऱ्याच जुन्या आणि बुरसटलेल्या विचारांच्या आधीन आहे. अर्थात तो पूर्णपणे तिचा एकटीचा दोष नाही. याला इतरही घटक जबाबदार आहेत, जसे कि आर्थिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक आणि सर्वात महत्त्वाचे घटक म्हणजे धर्म,जात,वंश.
तुम्ही म्हणाल आज वातावरण बदलले आहे सगळीकडे समानता जाणवते. एक प्रश्न स्वतः च्या मनाला विचारा,आपण खरंच बदललो आहोत का?आणि पूर्णपणे आपण पुरोगामीत्व स्विकारले आहे का?

आज महिला स्वतःच्या पायावर उभ्या आहेत, आर्थिक बाबींनी सक्षम आहेत,तरी देखील त्या स्वतःचे निर्णय स्वतः घेत नाहीत.किंबहूना घेऊ दिले जात नाहीत.

ग्रामीण भागात आणखी वेगळे चित्र आहे. बाई गावची सरपंच झाली पण सगळा कारभार नवरा पाहतो.पूर्वापार चालत आलेल्या रुढी आणि बोथट परंपरांमुळे तिच्या बुद्धीला गुलाम बनवले आहे.
अशिक्षित किंवा अर्धवट शिक्षण झालेल्या महिलांच्या बाबतीत या सगळ्या गोष्टी ग्राह्य धरल्या जाऊ शकतात पण शिक्षण पूर्ण होऊन नौकरी व्यवसाय करणाऱ्या महिलांमध्ये ही वेगळी सजगता आढळत नाही.

सावित्रीच्या लेकींना खऱ्या सावित्रीची अजून ओळखच पटलेली नाही.

Your word rules

फक्त आर्थिक समृद्धी म्हणजे विकास नाही,सद्सद्विविवेक बुद्धी ,वैचारिक प्रगल्भता, आचरण,जाणीव जागृती यावर ही लक्ष दिले गेले पाहिजे.तरच समाजाचा आणि महिलांचा सर्वांगीण विकास होईल.

आज २०२२ मध्ये नेमकं किती साध्य झाले हा प्रश्न विचारावा लागत आहे. या साठी खूप मूलभूत पातळीपासून काम करण्याची गरज आहे, एकवेळ सगळे पुरुष महिलेला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारतीलही, पण कुठल्या न कुठल्या बाबतीत पुरुषांवर अवलंबून राहण्याची आणि त्यांचा 'आधार' गृहीत धरण्याची महिलांची मानसिकता महिलांनाच बदलावी लागेल.

हो पण हे सर्व घडत असताना तिने स्वतः या बदलांचा अंगीकार करणं ही तितकच महत्वाचं आहे.
मग वर्षाचा एकच दिवस महिला दिन म्हणून साजरा न करता रोजचाच दिवस तिचा असेल तिच्या हक्काचा.



# व्यक्ती स्वातंत्र्य आणि आजची स्त्री

स्वप्ना रैंच

सकाळी गाण ऐकतांना एकदम सुंदर ओळी कानावर पडल्या " तुझ्याविना वैकुंठाचा कारभार चालंना, एकल्या विठुरायाला ह्यो संसार पेलंना"
POSHTER GIRL नावाचा एक मराठी सिनेमा आला होता त्यातल हे गाण. हे गाण म्हणजे वैभव जोशीची अतिशय सुंदर कविता आहे. कवितेची सुरुवातच इतकी सुंदर आहे की विचारांना जरा चालना मिळाली.

खरचं आहे कुठल्याही संसाराचा भार एकट्या विठुला पेलेल का? त्याची वामांगी रखुमाई जोपर्यंत सोबत कंबर कसून उभी राहात नाही तोपर्यंत हे सगळं सांभाळणं त्या विठुसाठी कठीणच आहे.

आज घराघरातले विठु आपल्या पोटापाण्याच्या उद्योगासाठी कुठे कुठे फिरतात त्यावेळी त्याच्यामागे त्याची रखुमाईच तर असते सगळ खंबीरपणे सांभाळायला. प्रत्येक घरातली ही रखुमाई म्हणजे त्या घराचा कणा असते, त्या घराचा श्वास असते.

आजची स्त्री स्वतः सुध्दा घराच्या बाहेर पडून कर्तृत्व गाजवते आहे, नवेनवे प्रांत आपल्या बुध्दिमत्तेच्या आणि परिश्रमाच्या बळावर काबिज करते आहे. पण खरच ती संसारापासून मुक्त होऊन हे सगळ करू शकेल का? करू शकेल नक्कीच पण सरते शेवटी तिला कुठेतरी

अपूर्णत्वाची जाणीव राहील, कदाचित् काहीतरी सुटल्याची भावना मनाला राहील कारण की ती "स्त्री "आहे. हाच तर मुख्य फरक आहे निसर्गाने स्त्री आणि पुरुषामध्ये केलेला.

स्त्री म्हणजे फक्त स्त्रीचं शरीर नव्हे किंवा तिची प्रजननशक्ती नव्हे किंवा तिची ममता किंवा तिचे आईपण नव्हे. स्त्री ही संकल्पनाच इतकी सुंदर आहे की तिची निर्मिती करतांना त्या निर्मात्याच्या मनात अतिशय हळुवार आणि तरल भावना निर्माण झाली असावी ज्यामधून स्त्री निर्माण झाली. स्त्री जितकी हळूवार आणि कोमल तितकीच ती कठोर सुध्दा असते. वेळप्रसंगी तिचे हे दुर्गेचे रूपही तिला धारण करावे लागतेच. जसे संस्कृतात म्हंटले आहे,"वज्रादपि कठोराणि, कोमल कुसुमादपि" अशा सगळ्या सुंदर छटांनी हे स्त्री नावाचे वस्त्र त्या परमेश्वराने विणले आहे.

कोलमडणारा संसार एक स्त्री जेवढ्या खंबीरपणे सांभाळते तेवढा तो प्रत्येक पुरुषाला जमेलच असे नाही. दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाल्यावर फास लावून घेणारा हा पुरुषच असतो किंवा संकटांना त्रासून व्यसनाधीन होणारा सुध्दा पुरुषच असतो. पण त्याच शेतकऱ्याची बायको त्याच्या मागे कंबर कसून, संकटांशी सामना करत आपल्या चिल्ल्यापिल्ल्यांना वाढवते पण हरुन जाऊन आत्महत्या नाही करत, हे आहे खरे स्त्रीत्व.

ब्रिटिशांनी आपल्या अख्ख्या देशावर सत्ता प्रस्थापित केली तेव्हासुध्दा सगळ्यात जास्त विरोध करणारी स्त्री राज्यकर्तीच होती. मग ती राणी चेन्नम्मा असो की राणी लक्ष्मीबाई असो किंवा अहिल्याबाई होळकर असो, ती चिवटपणाने लढली, संपली पण शरण नाही गेली.हाच चिवटपणा तिला लढण्याची शक्ती देतो. आज कुठलाही प्रांत असा नाही

की जिथे स्त्री ने आपले पाऊल रोवलेले नाही. तिने अशीच पंख पसरून भरारी घ्यावी. फक्त
" स्त्रीस्वातंत्र्य" नावाचा हा शब्द जो काही गोंधळ घालतोय त्यापासून जरा दूर राहावे किंवा त्याचा योग्य तोच अर्थ लावावा.

आर्थिक स्वातंत्र्य म्हणजेच फक्त स्त्री स्वातंत्र्य का? या प्रश्नावर प्रत्येक स्त्रीने विचार कराव असे मला वाटते, कारण हा विचारच चुकीचा आहे. फक्त अर्थार्जनाने स्त्री स्वतंत्र होते का? मग विचारांचे स्वातंत्र्य, किंवा निर्णयाचे स्वातंत्र्य तिला त्यासोबत मिळते का हा सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे असे मला वाटते. मग  MODERN बनणे म्हणजे स्वतंत्र होणे काय?

"WHY SHOULD BOYS HAVE ALL THE FUN "  अशी TAGLINE असलेली एक  ADVERTISE आली होती मध्यंतरी ती TAGLINE म्हणून छान होती पण स्त्रीने स्वतः ला पुरुषाशी COMPARE का करायचे?

ती पूर्णपणे वेगळी व्यक्ती आहे, तिचे संपूर्ण वेगळे अस्तित्व आहे, आणि मला असे वाटते की अशी COMPARISON करून स्त्री स्वतःच्या स्त्रीत्वाचा अपमान करते.स्त्री आणि पुरुष, हे स्रुष्टीचे चक्र असेच चालावे त्याचे संतुलन राखले जावे म्हणून त्या परमेश्वराने निर्माण केले. दोघांचेही महत्व तेवढेच आहे मग ही COMPARISON कशाला?

स्त्रीने स्वतः चे व्यक्तीमत्व फुलवावे,ती स्वतः परिपूर्ण अशी व्यक्ती असतांना पुरुष काहीतरी करतात म्हणून त्यांची नक्कल करणे किंवा ते करतात तर आम्ही का नाही?

Your word rules

याची तिला खरच गरज आहे का? यावर विचार करायला हवा.

पुरुष हे मानसिक रीत्या संवेदनशील गोष्टी हाताळायला कमजोर असतात म्हणून व्यसनांच्या पटकन् आहारी जातात पण स्त्रीचे तसे नसते ती कुठलीही गोष्ट समर्थपणे  हाताळू शकते मग उगाच पुरुष करतात तर मग मी का नको?  हे विचारच तिला कमजोर बनवतात हे आजच्या काही स्त्रियांना कळत नाही आहे.

ती उच्चशिक्षित आणि MODERN झाली पण  स्वैराचार आणि स्वातंत्र्य यात गल्लत होते आहे हे तिच्या लक्षात येत नाही आहे असे कधीतरी वाटते.

छत्रपतींना घडवणारी ती जिजाऊ काय अबला होती का? नक्कीच नाही, उलट तिच्या इतकी कणखर आणि खंबीर दुसरी कुठलीही स्त्री इतिहासात सापडणार नाही, हे खरं स्त्रीत्वाच प्रतिक.

स्त्रीवर वर्षानुवर्षे अन्याय झालाय तिचे शोषण झालेय हे सत्य आहेच पण आता तिने स्वतः सशक्त होऊन आपल्या माता भगिनींना पण हात द्यायचा आहे आणि खऱ्या अर्थाने या स्त्रीशक्तीचा जागर करायचा आहे.

सरतेशेवटी एवढेच म्हणावेसे वाटते ,
यादेवी सर्व भूतेषु "स्त्री" रुपेण संस्थिता नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।
प्रत्येक स्त्री मधल्या त्या रखुमाईला शतशः वंदन.



# स्त्री विकासाचा प्रवास

निर्मला मेंढे

राक्षसांचा संहार करणाऱ्या दुर्गा, काली, चंडी या देवता स्त्रीरूप असल्या तरी प्राचीन काळापासून भारतातील स्त्री शोषित व अन्यायग्रस्त आहे . कायम येथील स्त्री दुर्बल ,परावलंबी व अज्ञान अंधकारात पिचलेलीच होती.

धर्माने स्त्रीला धार्मिक रितीरिवाजात कोणतीही क्रियाशील भुमिका दिली नाही. उलट व्रतवैकल्यांचे ओझे पाप-पुण्याशी जोडून शारीरिक कष्ट व उपवास तिच्यावर लादले. नवऱ्याच्या मृत्यूनंतर सती जाणे, बालवयातील विवाह व मातृत्व , बाल विवाह , विधवांचे केशवपन , शिक्षणाचा अभाव हे येथील स्त्रीचे भोग होते.

धर्म, संस्कृती , परंपरा यांची बीजे समाजमनात खोलवर रुजलेली असतात. हजारो वर्षापासून स्त्री-पुरुषांच्या कामाची वाटणी ठरलेली आहे.

पूर्वीच्या काळी शिकार, लढाया, संरक्षण ही पुरुषांचे प्रमुख कर्तव्य होती. त्यानंतर शेती , अर्थार्जन , शिक्षण कुटुंबाची प्रतिष्ठा ,पत व नाव राखणे ,धार्मिक आणि सांस्कृतिक रितीरिवाज यांचे पालन, व्यक्तिगत विकास साधने इत्यादी कर्तव्ये करणे व कुटुंबाचे प्रमुखपद सांभाळणे हे कामे त्यांच्याकडे आली.

स्त्रियांकडे मात्र पूर्वापार घरकाम,मुलांना जन्म देणे आणि सांभाळणे, शेती व अन्य कामात मदत करणे अशी कामे होती.

स्त्रियांची कामे मुख्यतः शरीर पातळीवरची असून त्यांची बुद्धी व विचार यांना संधी मिळण्याची सोय या विभागणीत नाही. वरवर पाहता ही विभागणी न्याय्य व सोयीची वाटली तरी पुढे त्याला उच्च-नीच असा उतरंडी चा दर्जा प्राप्त झाला.

नरनारी ही व्यवस्था नैसर्गिक आहे . मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेत लिंग भेदभाव मुद्दाम घडवला गेला. संस्कृतीच्या इतिहासाने मर्दुमकी, पराक्रम, सामर्थ्य ,धैर्य , निर्भयपणा, बुद्धिमत्ता, धीटपणा या गोष्टी "पुरुषी" या  अभिधानाला चिकटवल्या . दुबळेपणा , परावलंबित्व, भित्रेपणा, चंचलता ,अधीरता ,लाजाळूपणा, रडवेपणा ,हळवेपणा अशा नकारात्मक प्रतिक्रियेने "बायकी" हे अभिधान दाखविण्यात आले.

पितृसत्ताक पद्धती स्त्रियांना मुख्य प्रवाहातून दोन टोकाच्या भूमिकांकडे लोटते. जिच्याबद्दल समाजाला आदर वाटतो ती देवता,पतिव्रता ,सौभाग्यवती व माता या भूमिका. तर दुसऱ्या टोकाला समाजामध्ये ज्यांना किंमत नाही अशा परितक्त्या , वेश्या, कुमारी माता , विधवा , प्रौढ कुमारिका अशा भूमिका. स्त्री ही माणूस आहे म्हणून व्यक्ती या स्वरूपात तिचा विचार होत नाही तर स्त्रीच्या पुरुषांशी असलेल्या संबंधावरून तिची भूमिका ठरते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या प्रबोधनयुगाने परंपरेवरची पुटे खरवडण्यास सुरुवात केल्यानंतर स्त्री उद्धाराचा

विचार व कृती यांना गती मिळाली .

राजा राम मोहन राय, स्वामी दयानंद सरस्वती ,महात्मा ज्योतिराव फुले , लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख ,आचार्य गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे , महर्षी धोंडो केशव कर्वे , महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी समाजसुधारकांनी सतीबंदी, बाल जठर विवाह प्रतिबंध, संमती वयाचा कायदा ,विधवा पुनर्विवाह, केशवपणाला विरोध ,स्त्रीशिक्षण, विधवा आश्रम इत्यादी संदर्भात विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत अनेक वैचारिक व कृतिशील चळवळी उभ्या केल्या.

सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात स्त्रियांसाठी पहिली शाळा महात्मा फुले यांनी काढली. लोकमताची पर्वा न करता, लोकांच्या छळाला न जुमानता ,सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, स्त्रियांच्या कैवारी आणि प्रौढ स्त्री शिक्षणाच्या पहिल्या पुरस्कर्त्या बनल्या.

"शिक्षणाने बाईला मनुष्यत्व येते व पशुत्व हटते"
त्यांनी ही स्त्रीमुक्तीची आधुनिक संकल्पना दीडशे वर्षापूर्वी सांगितली.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्त्रीच्या शिक्षण आणि विकासासाठी अत्यंत आग्रही होते. त्यांनी संविधानामध्ये महिलांसाठी अनेक तरतुदी करून ठेवल्या. त्यांचे असे मत होते की,
"एक स्त्री शिक्षित झाली तर ती संपूर्ण कुटुंब शिक्षित करते".

१९५२ पासून या खंडप्राय देशात निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाही राज्य शासनाचा पाया भक्कम बांधल्या गेला .सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा राजकीय हक्क मिळाला .

या मतदानाच्या अधिकारामुळे समस्त स्त्रीवर्ग एका फटक्यात पुरुषांच्या बरोबरीच्या स्थानावर आला.

आगामी काळात ज्या स्त्रिया ५० टक्के आरक्षणाचा आधार घेऊन निवडून येणार आहेत त्यांनी त्यांच्या हक्काचे मूळ मतदानाच्या हक्कात आहे हे नीट जाणून घेतले पाहिजे.

राज्यघटनेमध्ये स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी जी तत्त्वे दिली आहेत. त्यांच्या पूर्ततेसाठी स्त्रियांकरिता अनेक चांगले कायदे निर्माण झाले.

स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन व गर्भपात कायदेशीर करणारा कायदा हे कायदे स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले."आमच्या शरीरावर आमचा हक्क " या तत्त्वाच्या पूर्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरले.

स्त्रियांवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यांना प्रतिबंध करण्यासाठी अलीकडच्या काळात कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या. बलात्कार सिद्ध करण्याच्या बाबतीत कायद्यात सुधारणा, महिलांना दाद मागता यावी यासाठी ४९८(अ) चा समावेश. कुटुंबांतर्गत संरक्षण देणारा घरगुती हिंसाचार विरोधी कायदा ,आदी कायदे स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे ठरले.

विविध क्षेत्रामध्ये तसेच राजकारणामध्ये स्त्रियांना आरक्षण तसेच महिला धोरण तयार करण्यात महाराष्ट्राचा पुढाकार या जमेच्या बाजू ठरल्या. अर्थात या सर्व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे . महिलांसाठीच्या महिला आयोगासारख्या यंत्रणांचे काम

Your word rules

या मतदानाच्या अधिकारामुळे समस्त स्त्रीवर्ग एका फटक्यात पुरुषांच्या बरोबरीच्या स्थानावर आला.

आगामी काळात ज्या स्त्रिया ५० टक्के आरक्षणाचा आधार घेऊन निवडून येणार आहेत त्यांनी त्यांच्या हक्काचे मूळ मतदानाच्या हक्कात आहे हे नीट जाणून घेतले पाहिजे.

राज्यघटनेमध्ये स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी जी तत्त्वे दिली आहेत. त्यांच्या पूर्ततेसाठी स्त्रियांकरिता अनेक चांगले कायदे निर्माण झाले.

स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन व गर्भपात कायदेशीर करणारा कायदा हे कायदे स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले."आमच्या शरीरावर आमचा हक्क " या तत्त्वाच्या पूर्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरले.

स्त्रियांवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यांना प्रतिबंध करण्यासाठी अलीकडच्या काळात कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या. बलात्कार सिद्ध करण्याच्या बाबतीत कायद्यात सुधारणा, महिलांना दाद मागता यावी यासाठी ४९८(अ) चा समावेश. कुटुंबांतर्गत संरक्षण देणारा घरगुती हिंसाचार विरोधी कायदा ,आदी कायदे स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे ठरले.

विविध क्षेत्रामध्ये तसेच राजकारणामध्ये स्त्रियांना आरक्षण तसेच महिला धोरण तयार करण्यात महाराष्ट्राचा पुढाकार या जमेच्या बाजू ठरल्या. अर्थात या सर्व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे . महिलांसाठीच्या महिला आयोगासारख्या यंत्रणांचे काम

सक्षमपणे चालणे अपेक्षित आहे.

"निर्मिती" हा स्त्रीच्या आयुष्याचा भाग सोडला तर मनुष्य म्हणून असलेल्या सर्व क्षमता स्त्रीमध्ये ही आहेत.  हे तिने आता सिद्ध करून दाखविले आहे .आता असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यामध्ये स्त्रियांचा सहभाग नाही.

" मी कोण" या प्रश्नापासून स्त्रीचा "मी मला हवे ते होऊ शकते" या आत्मविश्वासाकडे झालेला प्रवास सोपा नाही. या दोन डगरींमधील अंतर मोठे असून ते पार करण्यासाठी तिला मोठा लढा द्यावा लागला आहे. स्वतःवर होणारे अन्याय समजणे , स्वतःला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाबद्दल असमाधान निर्माण होणे , स्त्रीच्या पारंपारिक भूमिकेला नकार देणे , स्वतःच्या सामर्थ्याबद्दल विश्वास असणे , अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची मानसिक ताकद असणे, समान स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करणे, स्वतःला समाजाच्या मध्य प्रवाहात एक व्यक्ती म्हणून संस्थापित करणे इत्यादी पायऱ्या चढतच स्त्री आत्मनिर्भर होऊ शकते.

पाश्चात्य स्त्री मुक्ती विचारात पुरुष विरोध, स्त्रियांच्या व्यक्तीवादाची स्थापना ,सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व समानता या तत्त्वांवर अधिक भर दिला गेला. भारतात स्त्री विरुद्ध पुरुष अशी भावना नसून स्त्रियांच्या उद्धाराचे काम मोठ्या प्रमाणात पुरुषांनी सुरू केले. भारतात कुटुंब संस्थेला महत्त्व असल्याने पिता, भाऊ ,मामा, काका इत्यादी नातेसंबंधातून स्त्री विकासाचे मार्ग खुले होतात. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीमुक्तीचा विचार भारतीय परिप्रेक्षात पाश्चात्य विचारांपेक्षा वेगळा करण्याची गरज भासते .तरी अंतिमतः स्त्रीमुक्तीचा विचार स्त्री

स्वातंत्र्य, समानता व आत्मनिर्भरता या  विचाराजवळच जातो.

स्वातंत्र्याच्या कक्षा जितक्या वाढतील तितका समाज पुढे जाईल . पण त्यासाठी सहिष्णुता ,सर्वसमावेशकता आणि मानवतावादी दृष्टिकोन व व्यवहार आवश्यक आहे.



# ये भारत की नारी है

अपर्णा बडे

पौराणिक काळात भारतीय संस्कृतीत स्त्रियांना सर्व क्षेत्रामध्ये संधी मिळत होती आणि समाजात त्यांना महत्त्व होतं स्थान होतं. पौराणिक काळात स्त्रियांना संधी होती पण मध्यंतरीच्या काळात अनेक बंधने आली.

शिक्षणाची कवाडे उघडल्यावर प्रगती झालीअनेक भारतीय विरांगणा नी इतिहासात आपलं नाव कोरलेल आहे.
तारामती, राणी लक्ष्मीबाई अहिल्यादेवी होळकर यांची नावं त्यांच्या कर्तृत्वामुळे सर्वांना परिचित आहेत सर्वांना.

गेल्या शतकाच्या अखेरीस असे म्हटले गेले की पुढील शतक ज्ञानाचे आणि महिलांचे असेल. एकविसावे शतक खरेच ज्ञानाचे टेक्नॉलॉजीचे ठरले आहे आणि यात महिलांनी खूप प्रगती करून जगात मानाचे स्थान मिळवले आहे.

भारतीय वंशाच्या महिलांनी आपली यशोपताका जगाच्या कानाकोपऱ्यात फडकवली आहे. क्षेत्र कोणतेही असो पण या स्त्रियांनी आपल्या प्रयत्नांनी अफाट ज्ञानसंपदा मिळविली अमेरिका इंग्लंड सारख्या प्रगत राष्ट्रांमध्ये भारतीय स्त्रियांनी अनेक मान सन्मान मिळविले आहेत.

मधल्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक कारणांमुळे बंधनात रहावं लागल. शिक्षणातून त्यांच्यासाठी प्रगतीची असंख्य दालन हळूहळू खुली झाली एकविसाव्या शतकात स्त्रियांनी उच्च शिक्षणात सगळ्या क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक यश मिळवलं आहे. शिक्षणाच्या आणि प्रयत्नांच्या जोरावर विविध राष्ट्रांमध्ये उच्चपदावर आपला ठसा उमटवला आहे.

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने काही भारतीय किंवा भारतीय वंशाच्या महिलांच्या बद्दल जाणून घेणे गरजेच आहे. असंख्य महिलांनी भारताचा नावलौकिक जगात उंचावला आहे.

इंद्रा नुयी. पेप्सी या अमेरिकी बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पद इंद्रा नूयी यांनी भूषविले आहे .टाईम्स सारख्या नियतकालिकाने त्यांचा उल्लेख जगातील सामर्थ्यशाली महिला म्हणून केला आहे.

कल्पना चावला. भारतीय वंशाची अमेरिकन प्रथम महिला अंतराळवीर जिचा दुर्दैवी मृत्यू १ फेब्रुवारी २००३ परतीच्या प्रवासात झाला.

सुनीता विल्यम्स हिने तर अंतराळात राहण्याचा जागतिक विक्रम केला आहे ती एक नेव्ही ऑफिसर आहे.  सुनीताने भारताची मान जगात उंचावली आहे.

ब्रिटनमध्ये भारतीय मूळ असलेल्या स्वराज पॉल लक्ष्मी मित्तल ह्या स्त्री उद्योजकांची नावे विशेष उल्लेखनीय आहेत. यांना लंडन चेंबर्स ऑफ कॉमर्स उद्योजक महिलांचा पुरस्कार दिलेला आहे.

बिहार मधून ब्रिटनमध्ये आलेल्या एका डॉक्टरच्या पत्नीने समोसे तयार करून विकण्यास सुरुवात केली ह्या परविन वारसी समोसा क्वीन म्हणून ओळखल्या जातात. आज त्या इंग्लंड मधल्या सर्वात श्रीमंत उद्योजिका आहेत.

अनारसे आजी . आपल्या अंगभूत कौशल्याच्या जोरावर परराष्ट्रात ब्रिटनमध्ये अनारसे आजींनी मराठी खानावळ चालवली आणि त्या खूप प्रसिद्ध आहेत.

ब्रिटनमध्ये होत असलेल्या नेतृत्व बदलात मूळ श्रुती वडेरा भारतीय वंशाची एक सामर्थ्यशाली महिला आहे .
ती ब्रिटनच्या पंतप्रधानांची खास सल्लागार आहे श्रुती वडेरा ची १९९९ साली निवड झाली होती.

गीता गोपीनाथ- फिस्कल स्कॉलर हार्वर्ड विद्यापीठा तील अर्थतज्ञ -एक भारतीय नारी. आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमुख अर्थतज्ञ म्हणून ओळखली जाते.

अरुंधती रॉय यांचं नाव आपल्याला परिचित आहेच त्या जागतिक आर्थिक फोरमच्या प्रमुख सदस्य आहेत.

पद्मश्री वॉरियर. या यु एस ए मधील सिलिकॉन व्हॅली याठिकाणी टेक्नॉलॉजी एक्झिक्युटिव्ह आहेत.उच्च तंत्रज्ञान आणि त्याचा उपयोग कसा करावा याची त्यांना पुरेपूर जाण आहे.

कमला हॅरीस या तर सध्या अमेरिकेच्या व्हाईस प्रेसिडेंट म्हणून

Your word rules

निवडून आलेल्या आहेत .आज जगामध्ये या भारतीय वंशाच्या स्त्रियांनी आपला झेंडा रोवला आहे.
भारताचं नाव उज्वल केल आहे.

क्रीडा क्षेत्रामध्ये तर भारतीय क्रीडापटूंनी जागतिक पातळीवरील स्पर्धांमधून सुवर्ण रजत आणि ब्राँझपदक मिळवलेली आहेत.

पी.टी. उषा एक सर्वोत्कृष्ट धावपटू तिने चार सुवर्ण पदके मिळवली तसेच अर्जुन पुरस्कार व पद्मश्री पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

सानिया मिर्झा भारतातील डब्ल्यूआय ए टूर्नामेंट जिंकणारी ही पहिली खेळाडू आहे. 2019 वर्ल्ड चॅम्पियन मध्ये गोल्ड मिळवून भारताची मान आणि शान उंचावली.

दीपा कर्मारकर. २४ वर्षीय जिमनेस्ट हिने ऑलिम्पिक मध्ये गोल्ड मेडल मिळवून एक कीर्तिमान स्थापित केलं.

हिमा दास. एक स्प्रिंट धावपटू हिने आशियाई खेळात व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये रजत आणि सुवर्णपदक पटकावलं.
अरुणिमा सिन्हा जागतिक कीर्ती मिळविली आहे एका एक्सीडेंट मध्ये आपले दोन्ही पाय गमावले तरी देखील कृत्रिम पाय लावून एव्हरेस्ट शिखर सर केलं आहे.

भारत ही या शतकातील उगवती महासत्ता आहे भारताने अमेरिकेच्या धोरणाला स्पष्ट विरोध करण्याचे धाडस दाखवले आहे भारतातील डॉक्टर्सच्या चमुने जागतिक विक्रम करोना काळात केलेला आहे यात

Your word rules

डॉक्टर्सच्या बरोबरीने नर्सेस यांनी  दिवस रात्र एकत्र काम करून देशसेवा केली आहे.

भारतातील अनेक उद्योजिका कलाकार शास्त्रज्ञ तंत्रज्ञ विधिज्ञ अर्थतज्ञ अशा सर्व क्षेत्रांमधील स्त्रियांनी राष्ट्राच्या प्रगतीचा खूप मोठा वाटा उचलला आहे.

नुकत्याच भारताचा अभिमान असलेल्या स्वरसम्राज्ञी गानसम्राज्ञी लता मंगेशकर या जागतिक ख्यातीच्या गायिका आपलं नाव विश्वाच्या अंतापर्यंत अजरामर करून गेल्या आहेत.

भारताच्या राजकीय परंपरेला सक्षम करण्यासाठी अनेक स्त्रियांनी आपल आयुष्यपणाला लावलेल आहे. वर्तमान काळातील स्वर्गीय इंदिरा गांधी माजी पंतप्रधान, स्वर्गीय सुषमा स्वराज देशाच्या परराष्ट्र मंत्री, देशाच्या माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी आपली कर्तव्य निष्ठेने  बजावली आहेत.

आज भारत अनेक राष्ट्रांना मागे टाकत प्रगतीच्या शिखराकडे वाटचाल करीत आहे त्यामध्ये अनेक स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे.

यातील डॉक्टर असीमा चॅटर्जी . या भारतीय विज्ञान काँग्रेसच्या जनरल प्रेसिडेंट आहेत.
अलका बॅनर्जी यांना जागतिक नारी म्हणता येईल यांनी स्टॉक एक्सचेंज बरोबर भारताचा माना अंक जोडला असून संयुक्त उपक्रम सुरु केलेला आहे.

चीफ जस्टिस सुजाता मनोहर या भारताच्या मुंबई हाय कोर्टाच्या प्रथम महिला सरन्यायाधीश आहेत.
रश्मी सिन्हा, नीता अंबानी जागतिक मान्यतेच्या उद्योजिका आहेत.

अभिमानाने घ्यावं असं नाव म्हणजे सीमा राव या प्रथम भारतीय कमांडो ट्रेनर आहेत यांनी आजपर्यंत पंधराशे कमांडो ना ट्रेनिंग दिलेल आहे.

विशेष उल्लेखनीय नाव गार्गी घोष या बिल व मेलिंडा गेट्स फाउंडेशन आणि फायनान्स मधील डायरेक्टर आहेत.
किरण बेदी पोलीस महासंचालक दिल्ली व नंतर दीव दमण च्या राज्यपालपदी कार्यरत आहेत.

अनुजा चव्हाण भारतीय जाहिरात क्षेत्रातील सर्वात युवा उपाध्यक्ष तसेच लक्षवेधी स्लोगन देणाऱ्या एक तडफदार महिला आहेत.
ये दिल मांगे मोर, तेढा है पर मेरा है. अशा असंख्य स्लोगन आपल्याला ऐकायला मिळतात.

किरण मजुमदार या बायोकॉन लिमिटेड मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.
धिव्या सुर्यादेवरा या जनरल मोटर्सच्या प्रमुख वित्तीय अधिकारी आहेत.
टेसी थॉमस. भारताला सक्षम करणाऱ्या अग्नि पुत्री या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या आपल्या मिसाईल वूमन आहेत.

अशा असंख्य भारतीय स्त्रियांनी भारतात आणि भारताबाहेर देखील जागतिक कीर्ती मिळविली आहे.

आज जग भारताकडे फार अपेक्षेने बघते आहे भारतीय स्त्रीचे भविष्य उज्वल आहे. कला ,साहित्य विविध क्षेत्रांमधल्या विदुषी जगविख्यात आहेत. या सर्व भारतीय स्त्रियांचा आम्हाला अभिमान वाटायला हवा.

म्हणूनच म्हटलं जातं
ये फुल नही चिंगारी है
ये भारत कि नारी है . जय हिंद

Your word rules



# अहिल्याबाई होळकर

**सौ. शरयु कोंडगिरे**

लोकमाता धर्मपरायणी , रणरागिणी , अष्टावधाणी , माहेश्वरी , महाश्वेता , प्रसंगावधानी समाजकारणी , राजयोगिनी , राष्ट्रउध्दारीणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यकर्तृत्वाला त्रिवार वंदन असो.

अहिल्याबाई लहानपणापासूनच धार्मिक संस्काराच्या वातावरणात वाढल्या होत्या. त्यांची आई सौ सुशीला बाई त्यांना रामायण व महाभारतातील कथा सांगत. यातूनच त्यांचे साहित्य प्रेम वाढत जाऊन त्यांनी महेश्वरात स्वतःचे ग्रंथालय उभे केले होते. त्यात अत्यंत दुर्मिळ असे ग्रंथ संग्रही होते.

महेश्वरातील ग्रंथसंग्रहात अभ्यासासाठी अनेक विद्वान पंडित त्यांच्याकडे येत असत. त्यांचे आदरातिथ्य करून अहिल्याबाई त्यांच्याबरोबर विविध विषयांवर चर्चा करीत असत.त्यात कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांचा उल्लेख आढळतो.

१७६८ मध्ये त्यांनी चांदवड वरून खास २३ पोथ्या मागवून घेतल्या होत्या. त्यांच्याजवळ धना बरोबरच ग्रंथाचाही संग्रह होता म्हणूनच त्या लक्ष्मी आणि सरस्वती कन्या होत्या.

अहिल्याबाईंना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये होती. मुक्ताबाई

मातेप्रमाणेच धर्मपरायण होत्या. त्यांचा जन्म १७४८ मध्ये झाला होता तर तिचे लग्न १७६६ मध्ये झाल्याचा उल्लेख आहे म्हणजेच वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर अहिल्याबाईंनी तिचा विवाह करून दिला.

त्याकाळात  अष्ट वर्षात भवेत कन्या म्हणजेच मुलगी आठ वर्षाची झाली की तिचे लग्न लावून दिले जायचे . अहिल्याबाई मात्र अंधरूढी व परंपरेच्या विरुद्ध जाऊन त्या काळात बालविवाह पद्धतीच्या विरोधात उभ्या राहिल्या व याची सुरुवात त्यांनी आपल्या स्वतःच्या मुलीपासून केली.

हे धाडस आधुनिक भारतीय स्त्रीला प्रेरणा देणारे आहे . त्यांनी मुक्ताबाईचे लग्न इतिहासाने नोंद घ्यावी अशा प्रकारे केले .त्या काळात राज्यात चोर दरोडेखोरांनी धुमाकूळ घातला होता .काही केल्या त्यांचा बंदोबस्त होईना.

जनतेचा राज्यकर्त्यांवरील विश्वास कमी होऊ लागला होता. म्हणून शेवटी अहिल्याबाईने महेश्वर येथे खास दरबार भरवून घोषणा केली की ,

चोर दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या शूरवीरा बरोबर माझ्या प्राणप्रिय कन्येचा विवाह लावून दिला जाईल तो शूरवीर कोणत्याही जाती-धर्माचा असला तरी सद्गुणाला आणि शौर्याला जात-धर्म नसतो असे जाहीर करून आपल्या मुलीचा विवाह परधर्मात करून देणारी अहिल्याबाई या पहिल्या स्त्री आहेत ज्यांनी सर्व धर्म समभाव आपल्या वर्तणुकीतून जगासमोर मांडला.

आज २१ शतकातही पर जाती, धर्मात आंतरजातीय धर्मीय विवाह

केल्यास किती विरोध होतो. धर्मांध प्रवृत्ती पुढे हतबल होऊन अनेकांना प्राणास मुकावे लागते. पण अहिल्याबाईनी २५० वर्षापूर्वी कर्तबगार प्रामाणिक तरुणासोबत वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपल्या मुलीचा विवाह करून दिला. सामाजिक समतेचा पुरस्कार त्यांनी स्वतःच्या कुटुंबापासून प्रारंभ केला.

अहिल्याबाई हुंडा पद्धतीच्या देखील विरोधक होत्या .त्यांनी आपल्या राज्यात हुंडा बंदीचा आदेश त्या काळात काढला होता तो असा ,

"श्री शंकर आज्ञेवरून जाहीर करण्यात येते की यापुढे कुठल्याही जाती जमातीत विवाहाचे समयी कन्येच्या पालन कर्त्याकडून हुंडा घेतल्यास तो गुन्हा समजण्यात येईल जो पैसे घेईल त्याच्याकडून दामदुप्पट जो देईल त्याच्याकडून त्याने जितके दिले तितके आणि मध्यस्थाकडून त्यास मिळाले असतील तितके सरकारात भरणा करावे लागतील याउपर अधिक रकमेचा दंड करण्याचा अधिकार सरकारला राहील"

१७ व्या शतकात हुंडा घेणारा व देणारा आणि मध्यस्थ यांना शिक्षा ठोठावण्याचा कायदा त्यांनी केला होता.

अहिल्याबाई आपल्या राज्यातील जनतेवर निस्वार्थ प्रेम करीत. कोणावरही कोणत्याही कारभाऱ्या कडून अन्याय होऊ नये यासाठी त्या सतत दक्ष असायच्या.

त्याकाळात श्रीमंत जमीनदार सावकार व्यक्ती निपुत्रिक मरण पावल्यास त्यांच्या विधवांना दत्तक घेण्याची परवानगी नव्हती अशा

Your word rules

वेळी त्यांची सर्व संपत्ती सरकार जमा केली जाई व प्रचंड नजराना भेट घेऊन त्यांना दत्तकाची परवानगी दिली.त्यांनी विधवांना असा सल्ला दिला की ,

"हा पैसा तुमच्या पतीचा आहे यावर तुमचा अधिकार व मालकी हक्क आहे तुम्ही तुमच्या इच्छेने हा पैसा एखाद्या अन्नछत्राला द्या , पाणपोई उघडा ,नदीवर बंधारा किंवा विहिरी खोदा आणि दानधर्माचे पुण्य घ्या"

त्याच बरोबर विधवेला राज्यात दत्तक घेण्यासही परवानगी दिली पती वारल्यानंतर त्याच्या संपत्तीवर पहिला अधिकार वारसा सर्वप्रथम अहिल्याबाईंनी आपल्या राज्यातील विधवांना मिळवून दिला.

अहिल्याबाईचे पती खंडेराव मरण पावल्यानंतर अहिल्याबाई त्यांच्यासोबत सती जाण्यास निघाला होत्या. त्यांचे सासरे मल्हाराव व सासू गौतमाबाई यांनी त्यांचे मत परिवर्तन करून त्यांना सती जाऊ दिले नाही. तसाच प्रयत्न अहिल्याबाईनी सासू म्हणून आपल्या लाडक्या बाल वयाच्या सुनांसाठी केला पण या कार्यात त्या दुर्दैवी ठरल्या सती जाण्यास  विरोध असताना देखील समाजापुढे मोठ्या समारंभपूर्वक मुलगा माले रावांच्या चितेवर सुनांना जाळण्यात आले यावरून २५० वर्षापूर्वी स्त्रियांची काय अवस्था होती हे लक्षात येते.

लहानग्या सुनांना जेव्हा सतीची वस्त्रे नेसवली तेव्हा अहिल्याबाईंनी प्रचंड विरोध केला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सतीच्या चाली विरुद्धच्या बंडाचा पहिला झेंडा उभारला.

अहिल्याबाईनी सतीची चाल , बालविवाह, दत्तक घेण्याची परवानगी,

वेळी त्यांची सर्व संपत्ती सरकार जमा केली जाई व प्रचंड नजराना भेट घेऊन त्यांना दत्तकाची परवानगी दिली.त्यांनी विधवांना असा सल्ला दिला की ,

"हा पैसा तुमच्या पतीचा आहे यावर तुमचा अधिकार व मालकी हक्क आहे तुम्ही तुमच्या इच्छेने हा पैसा एखाद्या अन्नछत्राला द्या , पाणपोई उघडा ,नदीवर बंधारा किंवा विहिरी खोदा आणि दानधर्माचे पुण्य घ्या"

त्याच बरोबर विधवेला राज्यात दत्तक घेण्यासही परवानगी दिली पती वारल्यानंतर त्याच्या संपत्तीवर पहिला अधिकार वारसा सर्वप्रथम अहिल्याबाईंनी आपल्या राज्यातील विधवांना मिळवून दिला.

अहिल्याबाईचे पती खंडेराव मरण पावल्यानंतर अहिल्याबाई त्यांच्यासोबत सती जाण्यास निघाला होत्या. त्यांचे सासरे मल्हाराव व सासू गौतमाबाई यांनी त्यांचे मत परिवर्तन करून त्यांना सती जाऊ दिले नाही. तसाच प्रयत्न अहिल्याबाईंनी सासू म्हणून आपल्या लाडक्या बाल वयाच्या सुनांसाठी केला पण या कार्यात त्या दुर्दैवी ठरल्या सती जाण्यास  विरोध असताना देखील समाजापुढे मोठ्या समारंभपूर्वक मुलगा माले रावांच्या चितेवर सुनांना जाळण्यात आले यावरून २५० वर्षापूर्वी स्त्रियांची काय अवस्था होती हे लक्षात येते.

लहानग्या सुनांना जेव्हा सतीची वस्त्रे नेसवली तेव्हा अहिल्याबाईंनी प्रचंड विरोध केला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सतीच्या चाली विरुद्धच्या बंडाचा पहिला झेंडा उभारला.

अहिल्याबाईनी सतीची चाल , बालविवाह, दत्तक घेण्याची परवानगी,

पडदा पद्धती स्त्रियांना सन्मान स्त्री उद्धाराच्या कित्येक संकल्पना आपल्या राज्यात अमलात आणल्या.

ग्राम राज्याची मुहूर्तमेढ पंचायत राज्य पद्धती , आदर्श न्याय व्यवस्था त्यांनी आपल्या राज्यात प्रथम सुरू केली सर्वांना समान आणि विविध व्यवसाय उद्योगांना मदत व प्रोत्साहन दिले.

अहिल्याबाईंचे कौतुक किती वर्णावे? त्यांचा दानधर्म, त्यांचे धार्मिक कार्य पाहिले की बुद्धी थक्क होते
"स्नानाने देह,ध्यानाने मन शुद्धि आणि दानाने धन शुद्ध होते"
असे म्हणणाऱ्या आणि त्याप्रमाणे वर्तन करणाऱ्या अहिल्याबाई राज्यकारभारातही निपूण होत्या.
सर्व वैभव उपभोगाचा त्याग करून पांढरीशुभ्र साडी परिधान करून घोंगडी वर बसून त्या राज्यकारभार चालवीत असत.

अहिल्या बाईंकडे सर्वधर्मसमभाव दृष्टी होती.त्या मंदिराप्रमाणेच मशिदीनांही मदत करीत. हिंदू पंडितांना जशा दान करीत तशा मुस्लीम फकीर व मौलवींना सुद्धा खैराती वाटत होत्या. सर्व मुस्लीम राज्य, राजवाडे यांचा आदर करीत. त्यांच्या राज्यात हिंदू, मुस्लिमांना सन्मान होता. त्यांनी बांधलेल्या धर्मशाळा ,रस्ते, घाट त्यांनी खोदलेल्या विहिरी, त्यांनी सुरू केलेली अन्नछत्रे, पाणपोया , त्यांनी रस्त्याच्या कडेला लावलेली दुतर्फा झाडे सर्व जाती धर्माच्या लोकांना व स्त्रियांना खुली होती.

अहिल्याबाईंचा त्याग,त्यांचे दु:ख,त्यांनी भोगलेल्या यातना, वैवाहिक जीवन, स्वकीयांचा त्रास,अशी अनेक संकटे सहन करून सोशिकतेचा

महामेरू असणारी ह्या पुण्यश्लोक लोकमाता सर्वांना नतमस्तक व्हायला भाग पाडतात.

त्या काळात स्त्रियांसाठी पडदा पद्धती होती. ही पद्धत मुख्यतः मुस्लिम राजवटीतून निर्माण झाली होती. पुढे हिंदू राजे, राजवाड्यातही स्त्रियांनी ही पडदा पद्धती सुरू ठेवली. पण अहिल्याबाईंना पडदा पद्धती मान्य नव्हती. त्यांनी ती कधीच पाळली नाही व ही पडदा पद्धती पाळलीच पाहिजे असे बंधनही कोणा स्त्रीवर लादले नाही.

आचार्य विनोबा भावे अहिल्याबाई बद्दल आपल्या लिखाणात म्हणतात की आम्ही भूदान चळवळ निमित्य जेथे जेथे गेलो तेथे तेथे अन्य प्रांतीय लोकांनकडून आम्ही अहिल्याबाईची स्तुतीच ऐकली . "शस्त्र बळाने दुनियेला जिंकणारे अनेक आहेत परंतु प्रेमाने भारतातील सर्व प्रांतातील जनतेला जिंकणारी अहिल्याबाई ही एकमेव भारतीय स्त्री आहे."

सुप्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत यांनी अहिल्याबाईंचा "महेश्वरा ची महाश्वेता" अशा शब्दात गौरव केला आहे.

साधी आणि प्रभावी, पार्थिक आणि पारलौकिक श्वेत वस्त्राचे पावित्र्य त्यांच्यासारखे कोणी राखू शकणार नाही. अहिल्याबाई बद्दल असे म्हणता येईल की त्या मराठी संस्कृती जपणाऱ्या खऱ्या अर्थाने

"प्रथम स्त्री-उद्धारक असून पुरोगामी विचारांच्या आदर्शाचे मूर्तिमंत प्रतीक होत्या."

Your word rules



# जागतिक महिला दिवस

उज्वला मुन

सर्व थरातील महिलांसाठी हा खूप महत्वाचा दिवस आहे.
या दिवशी महिलांनी राजकीय, सामाजिक , शैक्षणिक क्षेत्रात जे यश मिळवून प्रगती केली त्याला प्रोत्साहन मिळावे, कौतुक व्हावे आणि या पुढेही यशस्वीपणे आणि योग्य रीतीने वाटचाल करावी म्हणून हा दिवस उत्साहाने साजरा करण्यात येतो.

न्यूयॉर्कमध्ये,तेथील महिलांनी रस्त्यावर उतरून समान वेतन आणि मतदानाचा अधिकार याकरता आंदोलने केलीत. महिलांच्या तीव्र आंदोलनासमोर प्रशासनालाही झुकावे लागले आणि महिलांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या.

तो दिवस होता ८ मार्च १९०८.हाच दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानंतर जगभर आपले अधिकार घेण्यासाठी ठिकठिकाणी  महिला रस्त्यावर उतरून आंदोलने करू लागल्या. त्यांना आपले हक्क आणि गुलामगिरीची  जाणीव होऊ लागली आणि त्यातूनच महिला जागृती होऊन आज त्या स्वयंपूर्ण, स्वयंसिद्धा होऊ लागल्या.

८ मार्च हा सर्व महिलांसाठी एक मैलाचा दगड बनला आणि त्याचीच आठवण करून सर्व महिलांनी सतत जागरूक  राहण्यासाठी साजरा

करण्याचा हा दिवस....."गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो पेटून उठेल "
हे वाक्य बाबासाहेबांनी समस्त जनतेला दिले होते ते महिलांना तंतोतंत लागू होते कारण की त्यांनाही आपल्या गुलामीची जाणीव कित्येक वर्ष झाली नाही.

अजूनही ज्यांना ही गुलामगिरी समजली आहे त्या सर्वांनी इतर महिलांना आपल्या हक्काची जाणीव करून देणे आणि गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण खूप वर्षापासून चालत आलेली परंपरा इतक्या सहजतेने संपू शकणार नाही. त्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे लागेल.

त्यासाठीच तर महिला दिना सारखा "उत्सव" साजरा करून नवी ताकद उमेद संकलित करावी लागते. महिलांना स्वावलंबी,आत्मनिर्भर बनवण्यासाठी कायद्याचे ज्ञान ही काळाची गरज आहे.

समाज आणि कुटुंबातील पुरुषांचा समावेश ,सहकार्य आणि मानसिकता असल्याशिवाय स्त्रीच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण तयार होऊ शकत नाही. काळानुसार आपल्याही बदलायला पाहिजे.

आज सासू-सुने,नणद-भावजय यांचे नाते बदलू लागले आहे, घरातील महिला एकमेकींसोबत खूप मोकळ्या मनाने राहू लागली आहेत, एकमेकींना सांभाळू लागली आहेत. प्रत्येक क्षेत्रात ठिकठिकाणी महिला आहेतच. असे कोणतेही ठिकाण नाही जिथे स्त्रिया नाही आणि खूप आत्मविश्वासाने त्या आपले काम करत

आहेत.

भारतातील महिलांसाठी तर बाबासाहेबांनी संविधानातच अधिकार नमूद करून ठेवले आहेत. त्याच बळावर स्त्रिया आजवर अनेक ठिकाणी यशस्वी आहेत.

काही ठिकाणी स्त्रिया अजूनही प्रयत्न करत आहेत.पिढी दर पिढी महिलांचा वावर वाढतच जाईल आणि १९०८ साली  न्यूयॉर्क मध्ये झालेल्या उत्क्रांतीचा,मिळालेल्या हक्कांचा ,तिथून सुरू झालेल्या आंदोलनाचे सार्थकच होईल.....

Your word rules

शब्दपर्ण

दर्जेदार लिखाण घरोघरी पोहचवण्याचा 'शब्दपर्ण' टीमचा प्रयत्न आहे.

लिहिते व्हा....
शब्दाचे दान सगळ्यांच्याच पदरी पडत नाही.
ज्यांना ते मिळाले त्यांनी लेखन करायलाच हवे.
आपण लिहिले तरच आपल्या लिखाणात ताकद आहे,जादू आहे हे उमजते.

आमच्या ह्या प्रवासात  आम्हाला अशाच' लिहिते व्हा' म्हणणाऱ्या वाटसरुंची गरज आहे.

अट एकच..लिखाण दर्जेदार असावे.

इथे लिखाण मुक्त असेल,लेखणीला बंधने नाहीत.
आपण कथा,लेख, कविता ,रसग्रहण,(सिनेमा,नाटक,कविता,पुस्तक) व-हाडी लिखाण,समीक्षणे,बालसाहित्य,विनोदी कथा....यापैकी जे लिहायला आनंद मिळेल ते लिहायचे.

वेबसाईटवर विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतील.

शब्दपर्णशी जोडून शब्दपर्ण नावाचे एक youtube channel आहे. सादरीकरणाची कला अवगत असणारे त्याचा वापर करु शकतील.

याशिवाय 'शब्दपर्ण' अजून वाचनीय आणि दर्जेदार होण्याकरिता तुम्ही दिलेल्या सुचनांचे स्वागत आहे.

शब्दपर्ण फुल ना फुलाची पाकळी म्हणून शब्दपर्णसाठी जे लेखक लिहितील त्यांना views नूसार मानधन देणार आहे.

लिखाण पाठवण्यासाठी कृपया वेबसाईटवर Registration करा.

shabdaparna.in

marathi.shabdaparna.in

hindi.shabdaparna.in

english.shabdaparna.in

प्रिय वाचक,मराठी,हिंदी,इंग्लिश या तिन्ही भाषेत तुम्ही लिहू शकता.वेबसाईटवर login करण्यास काही अडचण आल्यास खालील मेलवर अवश्य संपर्क साधा.

मराठी- shabdaparnamarathi@gmail.com

हिंदी - shabdaparnahindi@gmail.com

English-shabdaparnaenglish@gmail.com

शब्दपर्ण टीम

# धन्यवाद

शब्दपर्ण वेबसाईटचा स्त्री विशेषांक'ती' साठी साहित्य पाठणाऱ्या साहित्यिकांचे  तसेच विशेषांकाला भेट देणाऱ्या वाचकांचे धन्यवाद

शब्दपर्णचा स्त्री  विशेषांक तुम्हाला कसा वाटला...अवश्य कळवा.
तुमचा प्रतिसाद आम्हाला नवीन लिखाणासाठी प्रोत्साहन देईल.